Liberal Education Society

लिबरल एजुकेशन सोसायटीचे

हडस हायस्कूल नागपूर

With compliments to
Shri V. V. Nahatkar
15/11/67



रजतमहोत्सव
स्मृति ग्रंथ

१९४२–१९६७

रजतमहोत्सव कार्यकारी मंडळ

श्री. रा. द. म्हसकर, प्रमुख
श्री. श्री. शां. गुप्ते
श्री. श्री. ना. सहस्रबुद्धे
श्रीमती अनुराधा परांडे
श्रीमती विद्यावती जोशी
श्रीमती सुहासिनी लाडकर
श्री. व. ग. पाठक, संपादक, स्मृतिग्रंथ

मुखपृष्ठ :
नागेश आर्डे, जी. डी. आर्ट

ठसे :
एम. आर. देऊसकर अँड सन,
धनतोली

प्रकाशक :
पु. रा. जोशी,
प्राचार्य, हडस हायस्कूल, नागपूर १

मुद्रक :
पां. ना. बनहट्टी,
नारायण मुद्रणालय,
धनतोली, नागपूर १

अनुक्रमणिका

		पृष्ठ क्रमांक
१.	संपादकीय	१
२.	आशीर्वाद व शुभेच्छा	३
३.	कै. वापूसाहेब हडस	५
४.	आम्ही त्यांचे ऋणी आहोत	९
५.	देणगीदारांची यादी	१०
६.	जुना शिक्षकवृन्द	१२
७.	गेली दोन तपे	१३
८.	शाळेच्या प्रगतिपथावरील काही टप्पे	१९
९.	माजी विद्यार्थ्यांच्या काही सुखद आठवणी	२७
१०.	हडस विद्यालयातील माझ्या काही गोड आठवणी	३९
११.	हडस विद्यालयाचे श्रेय व प्रेय	४१
१२.	आमच्या मुलांची शाळा	४५
१३.	एका पालकाचे विचार	४७
१४.	हडस हायस्कूल–शाळेचे विशेष संगीत	४९
१५.	हडस हायस्कूलची चित्रकलेतील प्रगती	५३
१६.	शालेय एन्. सी. सी. वृत्तान्त	५७
१७.	मुलींची एन्. सी. सी.	५९
१८.	Our Swimming Pool	६१
१९.	भारत स्काऊटस् ॲन्ड गाईडस्	६५
२०.	शाळेचे बुकस्टॉल	६६
२१.	विज्ञानमंडळ	६७
२२.	आमच्या विद्यालयाच्या सहली	६९
२३.	राष्ट्रभाषा हिन्दी के विकास में ···योगदान	७१
२४.	शिक्षक व कर्मचारी १९६७–६८	७३
२५.	शालान्त परीक्षेतील प्राविण्यप्राप्त विद्यार्थी	७५
२६.	प्रथम श्रेणीत आलेले विद्यार्थी	७९
२७.	कृतज्ञतानिर्देश	८८



माननीय श्री. नरेंद्र तिडके, श्रममंत्री, महाराष्ट्र राज्य
रजतमहोत्सवाचे उद्‌घाटक व प्रमुख पाहुणे.

शालेय शिष्यवृत्त्या

(१) श्री. **पु. रा. साठे**, सेवानिवृत्त डिस्ट्रिक्ट ॲण्ड सेशन जज्ज. देणगी २५०० रुपये. याच्या व्याजातून दरसाल शाळेतून S. S. C. मध्ये व ९ व्या वर्गातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला बक्षिसे देण्यात येतात.

(२) लेफ्टनंट कर्नल **विजय जोशी**, माजी विद्यार्थी. देणगी २५०० रुपये. याच्या व्याजातून दरवर्षी जो हडस शाळेचा विद्यार्थी इंडियन मिलिटरी ॲकॅडमीमध्ये प्रवेश घेईल त्या विद्यार्थ्याला बक्षीस देण्यात येते.

(३) सेठ **मल्लूराम मेहाडिया**, देणगी ५०१ रुपये. याच्या व्याजातून शाळेतील जो विद्यार्थी S. S. C. परीक्षेत हिंदीत सर्वाधिक गुण मिळवील त्याला बक्षीस देण्यात येते.

(४) **श्रीमती कै. बालाबाई शास्त्री** शिष्यवृत्ती—" शास्त्री रेडिओ सर्व्हिस " ह्या सुप्रसिद्ध संस्थेचे मालक शास्त्रीबंधू, यांनी आपल्या मातोश्री कै. बालाबाई शास्त्री यांचे स्मरणार्थ शिष्यवृत्ती-निधी म्हणून शाळेला रु. १५०० दिले आहेत. ह्या निधीच्या व्याजातून दरवर्षी या शाळेतील नवव्या वर्गातून वार्षिक परीक्षेस शे. ६० पेक्षा जास्त गुण मिळवून सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थिनीला एक वर्षा-करता याच शाळेत अभ्यासक्रम पुरा करण्याकरता शिष्यवृत्ती देण्यात येईल.

संपादकीय—

आमच्या सन्माननीय हितचिंतक–सुहृदांनो !

हडस विद्यालयाच्या रजत महोत्सवाच्या निमित्ताने प्रकाशित होत असलेला हा स्मृतिग्रंथ आपल्या हाती सादर भावाने सोपविताना आम्हाला आनंद होत आहे. आपल्याच सहानुभूतीने व सदिच्छांनी आम्ही भूतकालाचा खडतर व खाचखळग्यांचा मार्ग आक्रमिला आणि वर्तमानच्या प्रांगणावर येऊन दाखल झालो संस्थेच्या या जगन्नाथाच्या रथाला गतिमानता आपल्याच सहकार्याने लाभली आहे. भूतकालीन दोन तपांची वाटचाल ज्या सुहृदांच्या सहकार्याने आम्ही केली त्यांच्या अमाप ऋणातून मुक्त होण्याचा हा अल्पसा प्रयत्न आम्ही करीत आहोत. आपल्या लोभाची निर्मल गंगा अखंडपणे वाहत राहावी हीच प्रभुचरणी प्रार्थना.

आजचा आनंदोत्सव साजरा करीत असता गत दोन तपांचा भूतकालीन इतिहास आमच्या अन्तःकरणात जागृत होतो. त्यात पहिले स्मरण स्वर्गीय बापुसाहेब हडसांचे होते. त्यांनीच या संस्थेला जन्म दिला. केवळ संस्था काढून ते थांबले नाहीत तर संस्थेची पुत्राप्रमाणे जोपासनाही त्यांनी केली. स्वर्गीय बापुसाहेबांच्या विशुद्ध चारित्र्याला, निर्मल सेवाभावाला, ज्ञानदानाच्या अखंड साधनेला, अंगीकृत कार्य पूर्णतेला नेईलच या आंतरिक जिद्दीला, भविष्याचे अचूक वेध घेणाऱ्या दिव्य दृष्टीला आणि शाळेकरिता सर्वस्व समर्पणच नव्हे तर आत्मबलिदान करणाऱ्या धीरोदात्त मनोवृत्तीला आमचे सहस्रशः प्रणाम !

या प्रसंगी दुसरे स्मरण कै. दादासाहेब शेवडे यांचे होते. बापुसाहेब हडसांची अध्यापनचातुरी अन् प्रखर ध्येयवाद वघूनच संस्थेला सक्रिय सहानुभूती त्यांनीच दाखविली. 'गुणी गुणं वेत्ति' (गुणी जनांची परीक्षा गुणी जनच करतात.) या न्यायाने हडस–विद्यालयाला हाती धरून, त्यांनी त्याचा सर्व भार अंगावर घेऊन वाढविले. दादासाहेब मात्र त्या पुत्राचा दिव्य प्रताप वघण्याला आमच्यात नाहीत याचा खेद होतो. ' यादृशी भावना यस्य सिद्धिर्भवति तादृशी ' या उक्तीप्रमाणे आजचे हडस विद्यालयाचे विलोभनीय प्रगत स्वरूप येण्याला स्वर्गीय दादासाहेबांच्याच सदिच्छा कारणीभूत झाल्या हे मान्य करणे उचित ठरेल. स्वर्गीय दादासाहेब यांच्या पावन स्मृतीला शतशः प्रणाम.

स्वर्गीय दादासाहेब शेवडे यांच्या स्वर्गवासानंतर पोरक्या झालेला संस्थेला माननीय न्यायमूर्ती बापुसाहेब अभ्यंकर यांनी उदार मनाने व सहानुभूतीने आश्रय देऊन संगोपिले. महाराष्ट्रातील आदर्श शिक्षणसंस्थांत हडस विद्यालयाचा अन्तर्भाव व्हावा हीच जीवनाची इतिकर्तव्यता मानून अहोरात्र तिचा विकास घडविणाऱ्या योजना बापूसाहेब अभ्यंकरांनी कार्यान्वित केल्यात. या विद्यालयालाच आपले अपत्य मानून त्याच्या पालनाचा व सर्वांगीण विकासाचा भार आनंदाने व कर्तव्यनिष्ठेने आजही ते पार पाडीत आहेत, हे सर्वांना सुपरिचित आहेच. बापूसाहेबांची कार्यनिष्ठा, साधेपणा व अविरत सेवाभाव वघून कृतज्ञतेने अन्तःकरणात गहिवर येतो व शब्द अपुरे पडतात.

'नारायणे घातला पाया । पुरुषोत्तम झालासे कळस ।।' स्वर्गीय हडसांच्या अमूर्त मनोरथाला साकार व पूर्णस्वरूप आणण्याचे कार्य श्री. आप्पासाहेब जोशी यांनी केले. हडसांच्या मृत्यूनंतर काल-सागरातील तुफान लाटेवर गोते खाणाऱ्या कुजक्या नावेला सुखरूप काठावर नेऊन पोचविण्याचे विलोभनीय कार्य याच कर्णधाराने पार पाडले आहे. हडस विद्यालयाच्या दैदिप्यमान व नयनरम्य यशाचे खरे शिल्पकार आप्पासाहेबच होत. त्यांच्याच सुयोग्य मार्गदर्शनाने विद्यालयाला उत्तरोत्तर प्रगत रूप येत आहे. स्मृतिग्रंथाच्या संपादकाने केलेल्या गौरवापेक्षा भारतसरकारने राष्ट्रीय पारितोषिक देऊन केलेला गौरवच त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करणारा ठरतो. श्री. आप्पासाहेब जोशी यांच्या कार्याचे प्रात्यक्षिक चित्ररूपाने व लेखनरूपाने आपणापुढे सादर करीत आहोत. हडस विद्यालय व आप्पासाहेब जोशी—यांच्या परस्पर सापेक्षतेचा प्रत्यय त्यांच्या मागाहून वाटचाल करणाऱ्या कार्य-कर्त्यांना प्रेरक होईल ही अपेक्षा.

जान्हवीजलाप्रमाणे आसमंतीय प्रदेशाला पावन अन् समृद्ध करीत हा ज्ञानसरितेचा प्रवाह उत्तरोत्तर वर्धिष्णु व मनोवेधक रूपधारण करीत आहे. या ज्ञानसरितेला अनेक ज्ञात–अज्ञात प्रवाहांनी समृद्ध व वैभवशाली बनविले आहे. अनेक हितचिंतकांनी तनमनधनपूर्वक अकृत्रिम प्रेमाने शाळेला वेळोवेळी मदत करून कायमचे ऋणी करून ठेवले आहे. त्या सर्व ज्ञात–अज्ञात–अनामिकांचें —अनन्त स्वरूपात वावरणाऱ्या जनताजनार्दनाचे स्मरण आम्हाला निरंतन राहीलच. शाळेच्या प्रार्थनेत दररोज 'अनंता तुझे' ही प्रार्थना करून आम्ही जनताजनार्दनाचे आशीर्वाद प्रार्थीत असतो. विष्णु-सहस्रनामाप्रमाणे तो जनताजनार्दन अनंत आमच्यावर भविष्यातही मंगलांचा अविरत वर्षाव करो हीच सदिच्छा.

आमच्या यशाचा मापदंड विद्यार्थी होत. त्यांच्याच यशाने आम्ही यशस्वी ठरलोत. विद्यार्थ्यांची अढळ निष्ठा व अचल श्रद्धा असल्यामुळेच हडस विद्यालय अल्पावधीत हे मनोवेधक यश प्राप्त करू शकले. आमच्यावर असलेल्या या विद्यार्थ्यांच्या असीम प्रेमाचे वर्णन करण्याला शब्द अपुरे पडतात.

व. ग. पाठक
संपादक
रजतमहोत्सव स्मृतिग्रंथ

आशीर्वाद व शुभेच्छा

Dr. David G. Moses,
Retd. Principal, Hislop College

R. 891, New Rajinder Nagar,
NEW DELHI—5.
6th October, 1967.

I was very happy to get the information and pleased to note that you have remembered the Principal of your old College on this occasion.

I have been associated with you from the time you have been in Hislop College as a student. In your life and conduct during those years in the College I could remember traces of the abilities and talents that you will be bringing to any institution of which you became a part. I have known Hadas High School also for all these many years of my stay in Nagpur. The proud place it enjoys as one of the forward looking and leading schools in Vidarba is due to the devotion and untiring labour you have spent on it. It was characterstic of your student days that you were able to inspire the team spirit among your fellows. With the help of a united staff, your own enthusiasm and selfless devotion you have been able to make the school climb from one eminence to another eminence. Your abilities, as a teacher, as a Headmaster, have been publicly recognised and Hislop College, your Alma Mater, is proud of the work you have done in Higher Secondary School education in Vidarbha. More than all that you have done, I have been happy to note in your school the forward looking attitude, not feeling satisfied with what has been done but going forward to greater heights.

It is always good to remember that in the intellectual and moral world nothing is finished. The fulfilment of one ideal or the working out of one project only serves to open up higher and newer ideals, more difficult and wider projects. I hope you and your school will always have this character of looking forward into the future and serving the student community in new ways.

God has blessed your efforts in the past and my prayer for you and your School on this auspicious occasion is that His gracious blessings may rest upon you continuously and your School continue to shine with increasing brightness.

* *

प्रा. म. दा. साठे

८५४ सदाशिव, 'पारिजात', **पुणें,**
दि. ३०–९–६७

सप्रेम अनेक आशीर्वाद,

माझे मित्र श्री. केळकर यांनी मला काल तुमचे पत्र दिले. फार समाधान झाले. शिक्षण-क्षेत्रात कार्य करून एका नव्या पिढीला कार्यक्षम करण्याचे व्रत तुम्ही स्वीकारले याबद्दल माझा तुमच्या-विषयीचा आदर द्विगुणित झाला. शिक्षक हा देशाच्या भव्य मंदिराच्या पायाखालचा एक महत्त्वाचा भाग आहे. कळसापेक्षाही त्याचे काम महत्त्वाचे आहे. तो ते अल्पवेतनावर व लोकांकडून अपेक्षित आदराची इच्छा न करता कर्तव्यबुद्धीने करतो ! तुमच्या शाळेच्या रजत महोत्सव प्रसंगी मी सदिच्छा व्यक्त करून शाळेच्या कार्यास वाहून घेतलेल्या शिक्षकांनी 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' हे गीतावचन दृष्टीपुढे ठेऊन तरुण पिढीला मार्गदर्शन करावे व मागच्या पिढीतील शिक्षकांचे जे प्रमाद झाले असतील ते टाळावेत. असो, कळावे, हे वि.

* *

डॉ. शंकर दामोदर पेंडसे,

हिंदुधर्म संस्कृतिमंदिर,
धंतोली, नागपूर–१.

विजया दशमी, १८८९

१२–१०–६७

हडस हायस्कूलचा रजतमहोत्सव या वर्षी साजरा होत आहे. गेल्या १५ वर्षांत या शाळेची झालेली प्रगति आश्चर्यकारक व आनंददायक आहे. तिचे सर्व श्रेय या शाळेचे प्राचार्य श्री. पु. रा. जोशी व त्यांचे सहकारी यांना दिले पाहिजे.

श्री. जोशी यांनी भारतीय परंपरा न सोडता, शिक्षणक्षेत्रात झालेल्या सर्व अद्ययावत् सुधारणा आपल्या शाळेत केल्या. शिक्षक आणि विद्यार्थी यांनी त्यांचा आनंदाने स्वीकार केल्यामुळे शाळेला आजचे भव्य स्वरूप येऊन ती नागपुरातील आदर्श शाळा झाली आहे.

मुले मुळात चांगली असतात. पालक व शिक्षक यांनी त्यांना चांगले वळण लावले तर ती मुले उत्तम विद्यार्थी म्हणून नावं काढतात, हा श्री. जोशी यांच्यासारख्या शिक्षणतज्ज्ञाचा अनुभव लक्षात घेण्यासारखा आहे.

शाळेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य असे की तेथे संस्कृत विषय आवश्यक आहे आणि पारशी विद्यार्थिनीसुद्धा तो हौसेने घेतात. याचे श्रेय शाळेच्या विद्वान् आणि कुशल संस्कृत अध्यापकांना दिले पाहिजे.

श्री. जोशी यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपले शैक्षणिक जीवन समृद्ध केले व त्याचा उपयोग रात्रंदिवस शाळेच्या प्रगतीकरिता करून ती ऊर्जितावस्थेला आणली. शाळेचा उत्तरोत्तर असाच उत्कर्ष व्हावा आणि श्री. जोशी यांनीच तिचा सुवर्णमहोत्सवही साजरा करावा असे या प्रसंगी इछितो..

कै. बापूसाहेब हडस



आज महाराष्ट्रातील नामांकित शाळांत सुदैवाने हडस विद्यालयाची गणना होते. या शाळेचे संस्थापक मुख्याध्यापक कै. नारायण शंकरराव उपाख्य बापूसाहेब हडस यांचे अल्पचरित्र या रोप्य–महोत्सव–स्मरणिकेत आम्ही सादर करीत आहो.

बापूसाहेबांचा जन्म खानदेशातील जळगाव जिल्ह्यातील रावेर तालुक्यात सावदा या गावी दि. १९–३–१९०४ साली झाला. त्यांच्या वडिलांचे नाव शंकरराव व आईचे नाव पार्वतीबाई.

त्यांचे प्राथमिक शिक्षण सावदा येथे त्यांच्या आजोळी झाले. खांडवा येथे आपल्या आतेजवळ राहून शिष्यवृत्ती (स्कॉलरशिप) संपादन करून त्यांनी माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. घरची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता त्यांनी नोकरी पत्करावी अशी साहजिकच त्यांच्या नातलगांची इच्छा होती, पण बापूसाहेबांची तेजस्वी बुद्धी व प्रज्वलित ज्ञानलालसा त्यांना स्वस्थ बसू देईना. शिकवण्या करून उच्च शिक्षण घेऊन ते १९२४ साली बी. एस्सी. झाले. कष्टप्रियता व स्वावलंबन या गुणांमुळे त्यांनी स्वाभिमानपूर्वक आपली महत्त्वाकांक्षा सिद्धीस नेली.

जबलपूर येथील रॉबर्टसन कॉलेजमध्ये त्यांनी प्राध्यापक म्हणून दोन वर्षे काम केले. येथील पटवर्धन विद्यालयात काही काळ विज्ञानशिक्षक म्हणून त्यांनी काम केले. गांधीयुगाच्या त्या प्रभावशाली कालखंडात सरकारी नोकरी सोडून ते सुळे हायस्कूलमध्ये आले. इ. स. १९३१ साली ते एल्एल्. बी. झाले त्याच वर्षी मुख्याध्यापक (सुपरिंटेंडेंट,) म्हणून नेमणूक झाल्यावर त्या दृष्टीनेच त्यांनी तेथील आदर्श प्रयोगशाळा आपल्या योजनेला अनुसरून बांधली.

सुळे हायस्कूल सोडल्यानंतर विद्यार्थ्यांच्या आग्रहामुळे त्यांना हडस विद्यालय स्थापन करावे लागले. इमारतीच्या अभावी गुरुकुलातल्याप्रमाणे झाडाखाली बसूनही शिकण्याची आपली तयारी असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितल्यानंतर विशुद्ध बालहृदयातील अंतःप्रेरणेला बापूसाहेबांनी मान व मान्यता न दिली तरच नवल! शाळेला 'कृष्ण विद्यालय' हे नाव द्यावे अशी त्यांची इच्छा होती, पण विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या आग्रहामुळे या शाळेचे नाव हडस हायस्कूल ठेवण्यात आले. शाळेच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष विख्यात कायदेपंडित श्री. दादासाहेब शेवडे होते. त्यांच्याकडे बापूसाहेबांची शिकवणी असल्यामुळे त्यांना हडसांच्या स्वभावाची, अध्यापन कौशल्याची व ध्येयवादाची कल्पना होतीच. त्यांनी संचालक मंडळाला त्यांच्या ध्येयधोरणानुसार Liberal Education Society हे नाव दिले व या संस्थेने ही शाळा

२ जुलै १९४२ या क्रांतिकारक वर्षी स्थापन केली. पालकांनी आपल्या मुलांची नावे या शाळेत घालून सक्रिय सहानुभूती प्रकट केली. लोकमान्यतेबरोबर शासनानेही शाळेला लवकरच मान्यता देऊन गुणगौरव केला व संस्थेने बाळसे धरले.

ज्या इमारतीत शाळा भरत होती ती न्यायालयाच्या तत्संबंधी निर्णयानुसार सोडावी लागल्यामुळे त्यांना राहत्या बंगल्यात वर्ग भरवावे लागले. जागेच्या संकोचामुळेच अधिक विद्यार्थ्यांना प्रवेश देता येईना. अशा कठीण काळात अयाचित वृत्तीने शाळा चालवितांना त्यांना किती तरी क्लेश सहन करावे लागले. संस्थारूपी मानस अपत्य जगविण्यासाठी त्यांनी सर्वस्वसमर्पणच नव्हे तर आत्मबलिदान केले. हे अपत्य आपले नाव काढील अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. 'यादृशी भावना कुर्यात् सिद्धिर्भवति तादृशी।' या न्यायाने आप्पासाहेब जोशी 'प्रीणाति यः सुचरितैः पितरं स पुत्रः' या वचनानुसार या संस्थेच्या विद्यमान धुरंधर मुख्याध्यापकांनी त्यांची अपेक्षा पूर्ण केली हे आपण प्रत्यक्ष पाहत आहोच.

त्यांचे गुणविशेष

आपल्या असामान्य अध्यापन–नैपुण्याने त्यांनी इतर सामान्य शिक्षकांना नकळत प्रशिक्षणाचे आदर्श पाठ दिले व मुख्याध्यापक या नात्याने खेळाडूंना उत्तेजन दिले. विद्यार्थ्यांच्या विविध सुप्त गुणांना जागृत करून विकसित करण्याकरिता इतर सुधारलेल्या राष्ट्रांत जे जे चालले असेल त्याचा व्यासंग करून त्यांनी आपल्या परिस्थितीत शक्य असतील त्या उपायांचा उपयोग करून घेण्याकडे त्यांच्या मनाचा ओढा असल्यामुळे शाळेची सर्वांगीण प्रगती घडवून आणण्याची पराकाष्ठा केली. बाह्यशालेय चळवळी (extra curricular activities) मध्येही ते स्वतः व त्यांचे विद्यार्थी अग्रेसर असत. विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी, तक्रारी, सूचना, आकांक्षा, अपेक्षा स्वतः ऐकून घेऊन ते त्यांच्यामध्ये जिव्हाळा निर्माण करीत. त्यामुळे विद्यार्थी त्यांची आज्ञापाळण्यास स्वाभाविकतः उत्सुक असत. बटुमूर्ति पण बहुजनसमाजावर प्रभाव असलेली, मितभाषी पण हृदयाचा ठाव घेणारी पाश्चात्त्य वेषभूषानिपुण पण पोवाँत्यांतील अध्यात्मिकतेकडे आकृष्ट झालेली, विविधगुणसंपन्न पण प्रसिद्धि पराङ्मुख व्यक्ति, त्यांनी किती विद्यार्थ्यांना, शिक्षकांना, कर्मचाऱ्यांना किती प्रकारे साह्य केले असेल हे एक सर्वसाक्षी ईश्वरच जाणे. शंभर रुपये महिन्याच्या शिकवण्या घरबसल्या चालत येऊनही त्यांच्या उदार स्वभावामुळे त्यांच्याजवळ धनसंचय होणे कसे शक्य होते ? स्वतः लहानपणी भोगलेल्या अडचणींमुळे 'प्राणिनाम् आर्तिनाशनम्' हा त्यांचा स्थायीभाव झाला होता.

ज्या गोष्टीत त्यांना संतोष वाटतो तिच्या आड यावयाचे नाही एवढेच नव्हे तर स्वतः निरंतर तत्पर राहून त्यांच्या मित्रमंडळीची त्यांच्या दर्जाला शोभेल अशी सुव्यवस्था ठेवावयाची ही दुर्मिळ असिधाराव्रतसिद्धी त्यांच्या कुटुंबीय मंडळींनी संपादन केली व आजन्म पाळली. थोरांच्या कुटुंबातील व्यक्तींना जी मूक महत्सेवा करावी लागते तिचे वर्णन 'जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे।' या संतवाणीखेरीज दुसऱ्या कोणत्या यथार्थ शब्दांनी करता येईल ? त्यांना असे निष्ठावंत कुटुंबीय व सहकारी लाभले.

शाळेच्या आवारातील क्षेत्र त्यांच्या कर्तृत्वाला अपुरे पडल्यामुळे बालवीर चळवळ, सहकारी संस्था, नागपूर स्कूल ऑफ आर्ट, नाग असोसिएशन, सोशल एज्युकेशन, भातखंडे संगीत विद्यालय इ. अनेक संस्थांशी त्यांचा कर्तृत्वशाली पदाधिकारी म्हणून संबंध होता. सामाजिक जीवन विविध बाजूंनी वैभवशाली व्हावे म्हणून आपल्या बुद्धीचा व शक्तीचा त्यांनी अहर्निश समाजपुरुषाला हविर्भाग अर्पण केला.

हा अनेकविध कार्यांतील ताण सहन करण्यास शरीर असमर्थ असल्यामुळे त्यांनी १७ ऑगस्ट ११५२ रोजी देह ठेविला. त्यांच्या मृत्यूचा सोहळा ज्यांनी प्रत्यक्ष पाहिला ते 'असे कार्यमग्न असताना अनायासे येणारे आकस्मिक मरण पुण्यवंताच्या नशीबी असते' असे म्हणतात. पौर्णिमेच्या दिवशी समुद्राला भरती यावी त्याप्रमाणे त्यांचे अंत्यदर्शन व अंत्ययात्रा वघण्यासाठी आबालवृद्ध जनसंमर्द उसळला. 'जगण्यासारखे जोपर्यंत काही जवळ आहे तोपर्यंतच मरणात मौज आहे' हे त्यांच्या मृत्यूने सिद्ध केले.




कै. टी. एल्. शेवडे
लिबरल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक
अध्यक्ष
शाळेच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष
१९६३–६४



डॉ. भवानीशंकर नियोगी
अध्यक्ष १९६३–६४



न्यायमूर्ती ना. ल. अभ्यंकर
संचालक मंडळाचे सध्याचे अध्यक्ष
व
शाळेची प्रेरक शक्ती



श्री. पु. रा. जोशी
शाळेचे प्राचार्य व व्यवस्थापक

आम्ही त्यांचे ऋणी आहोत

१९५४ सालची गोष्ट. हडस हायस्कूलला मध्यप्रदेश सरकारने उत्तर अंबाझरी मार्गावर शाळेच्या इमारतीकरिता १·९० एकर जागा द्यावयाचे ठरविले. पण त्यांची एक अट अशी होती की लिबरल एज्युकेशन सोसाबटीने बँकेत कमीत कमी दहा हजार रुपये तरी बिल्डिंग फंडात आहेत असे दाखविले पाहिजे. फार अडचणीची वेळ होती. बँकेत रकम जमा झाली नाही तर जागा परत जाण्याची भीती. अशा कठीण प्रसंगी खालील व्यक्तींनी उदार अंतःकरणाने ठेव म्हणून मोठ्या रकमा दिल्या. सर्वांच्या ठेवी आम्ही परत करू शकलो याचे आज आम्हाला फार समाधान वाटते.

(१)	डॉ. एस्. डब्ल्यू. चितळे	रु. १०००
(२)	कै. शंकर लक्ष्मण खरे	रु. २४००
(३)	श्रीमती सुमतीबाई घारपुरे	रु. ६२५०
(४)	श्री. पी. आर. साठे	रु. १०००
(५)	श्री. टी. के. पिंपळे	रु. १०००
(६)	कै. एम्. व्ही. केळकर	रु. १०००
(७)	श्री. व्ही. एन्. गाडगीळ	रु. ५०००
(८)	श्री. केशवराव घारपुरे	रु. २०००
(९)	श्रीमती डॉ. दुर्गाताई वझलवार	रु. १००००
(१०)	श्रीमती नानीबाई तालुकदार	रु. ७०००
(११)	सौ. मालतीबाई घारपुरे	रु. ११०००
(१२)	श्री. गोपाळकृष्ण देवस्थान वहिवाटदार श्रीमंत जी. जी. बुटी	रु. ३०००

याशिवाय श्रीमंत गणपतराव बुटी यांनी आपल्या नावावर असलेल्या रु. २५००० रुपयांच्या गव्हर्नमेंट सिक्युरिटीज काही मुदतीकरिता लिबरल एज्युकेशन सोसायटीच्या नावाने केल्या होत्या. एवढचा मोठ्या रकमा आमच्या हाती आल्याने आम्हाला शाळेच्या इमारतीचे, स्विमिंगपूलचे व रिक्रिएशन हॉलचे बांधकाम हाती घेता आले. या सर्वांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोत.

पु. रा. जोशी
जॉइंट सेक्रेटरी,
लिबरल एज्युकेशन सोसायटी, नागपूर


विशेष उल्लेखनीय आश्रयदाते

	नाव	रुपये
१.	श्रीमती यशोदाबाई खरे	१५०००
२.	कै. दादासाहेब शेवडे	८०००
३.	श्रीयुत पी. आर. साठे	२५०१
४.	ले. कर्नल विजय जोशी	२५००
५.	कै. गंगाबाई गोखले	१०००
६.	डॉ. एन. जी. सावकार	१००१
७.	श्री. एस. आर. तिडके	१०००
८.	श्री. डी. पी. मोदी	१००१
९.	श्री. गंगाधर रानडे	५०१
१०.	श्री. व्ही. वी. पांडे	५०१
११.	श्री. व्ही. जी. हरदास, ॲडव्होकेट	५०१
१२.	श्री. माधवराव पाटील, रामदासपेठ	५०१
१३.	श्री. जी. आर केतकर, धंतोली, नागपूर	१०१
१४.	श्री. डी. आर. बोधनकर	१०१
१५.	श्री. बाबुराव तांबे	१०१
१६.	कु. रजनी भिडे	१०१
१७.	श्री. जे. व्ही. देशपांडे लक्ष्मी नगर, नागपूर	१०१
१८.	डॉ. पी. एस. पेंडसे, धंतोली, नागपूर	१०१
१९.	श्री. के. जी. भोंसुले	१०१
२०.	डॉ. एन. ए. देशमुख	१०१
२१.	श्री. व्ही. के. रानडे	१०१
२२.	श्री. डी. व्ही. भिडे	२५१

	नाव	रुपये
२३.	डॉ. तांबे, धंतोली, नागपूर	१०१
२४.	श्री. व्ही. जी. माने	१०१
२५.	डॉ. पावडे	१०१
२६.	श्री. पी. आर. मोदी	१००१
२७.	श्री. व्ही. के. परांजपे	१०१
२८.	M/s. वल्हबभाई ॲंड सन	१५१
२९.	वापट बन्धू	२५१
३०.	श्री. डी. एच. सहस्रबुद्धे	१०१
३१.	श्री. जी. एस. गोखले	१०१
३२.	श्री. व्ही. बी. बोकारे	१०१
३३.	डॉ. के. वाय. श्रीखंडे	१०१
३४.	श्री. वी. टी. पुरुशे	१०१
३५.	श्री. वसंतराव साल्पेकर	२५१
३६.	श्री. मनोहरराव पांडे	५०१
३७.	श्री. एस. एस. बनहट्टी	२०१
३८.	महाराष्ट्र राष्ट्रभाषा प्रचार सभा, धंतोली, नागपूर	१०१
३९.	श्री. मल्लुराम मेहाडिया ॲंड सन, सितावर्डी, नागपूर	५०१
४०.	श्री. जी. टी. परांडे, धंतोली, नागपूर	१०१
४१.	सौ. मंदाकिनी पारखी, धरमपेठ, नागपूर	१०१
४२.	श्री. डब्ल्यु. व्ही. खरे, धरमपेठ, नागपूर	१०१
४३.	बिमल स्पोर्टस्	१०१

	नाव	रुपये		नाव	रुपये
४४.	श्री. गोपाळ कृष्ण उदार	१०१	५३.	श्री. जी. एच. सहस्रबुद्धे	५१
४५.	श्री. बाळासाहेब महाजन	१०१	५४.	श्री. सी. एच. चौधरी	५१
४६.	सौ. सुहासिनी लाडकर	५१	५५.	श्री. एम. एच. मुंजे	५१
४७.	श्री. एम्. डब्ल्यू. कळमकर	५१	५६.	श्री. डी. के. गुप्ते	५१
४८.	श्री. दिनकरराव गोडबोले	५१	५७.	डॉ. एम्. बी. नियोगी	५१
४९.	श्री. व्ही. डी. सरंजामे	५१	५८.	डॉ. ए. व्ही. शिवदे	५१
५०.	श्री. पी. आर. साठे	५१	५९.	डॉ. जयंत व्ही. शिवदे	५१
५१.	डॉ. ए. जी. सावकार	५१	६०.	श्री. व्ही. के. जोशी	५१
५२.	श्री. रामलालजी राठी	५१	६१.	श्री. पी. जी. जोशी	५१

शिक्षक व कर्मचारी १९५६-१९५७



गेली दोन तपे

श्री. दत्तात्रय विश्वनाथ भिडे,
आजीव सेवक



मी नागपूरला १९४० साली आलो. तोपर्यंत मी श्री. हडस यांचे नाव फारसे ऐकले नव्हते. १९४२ साली श्री. हडसांना सुळे हायस्कूल सोडावे लागले. त्यावेळी नागपुरातील शिक्षकांत बरीच खळबळ माजली. श्री. हडसांना शाळा सोडावी लागत आहे याचे बऱ्याच जणांना फार वाईट वाटले. श्री. हडस हे विद्यार्थी वर्गात किती प्रिय होते याचा अनुभव ६ ऑगस्ट १९४२ रोजी आला. त्या दिवशी हडसांच्या घरासमोरील पटांगण विद्यार्थ्यांनी फुलून गेले होते. रात्रीतून फर्निचर, साईनबोर्ड, जाहीरपत्रके यांची तरतूद होऊन तीन ठिकाणी शाळेचे वर्ग सुरू झाले. हे पाहून मी फार प्रभावित झालो.

पण सुरवातीचा उत्साह पुढे थोडा ओसरला. बरेच विद्यार्थी परत गेले. काही इतर शाळांतून पांगले. बरेचसे शिक्षक सुद्धा हळूहळू शाळा सोडून गेले. थोडावेळपुरती आलेली सूज उतरून गेली, पण ध्येयवादाने प्रेरित झालेले शिक्षक व जवळजवळ तीनशे विद्यार्थी कायम राहिले.

त्यावेळी शाळा सध्या जिथे नेत्रसुधारसंघाची इमारत आहे तेथे श्री. परांडे यांचा बंगला होता तेथे भरत असे. पुढे तो श्री. बनवारीलाल यांनी विकत घेतला व त्यांनी शाळेला जागा रिकामी करविण्याकरता कायदेशीर कारवाई सुरू केली.

मी त्यावेळी सेवासदन हायस्कूलमध्ये होतो. रोज हडस हायस्कूल वरून जा-ये करताना त्या लहानशा जागेत जे कार्य चालत होते ते पाहून आपण जर या शाळेत आलो तर आपल्या मनात ज्या काही कल्पना आहेत त्या मूर्त स्वरूपात आणण्याला चांगले क्षेत्र मिळेल असे सारखे वाटत असे. त्यानंतर श्री. हडसांशी बऱ्याच वेळा भेटण्याचा प्रसंग आला. त्यावरून शिक्षण व विद्यार्थी त्यांच्याकरता रुळलेली चाकोरी सोडून काही तरी करण्याची तळमळ ह्या गृहस्थाला लागलेली आहे हे दिसून आले. जरी ते प्रशिक्षित नव्हते तरी शिक्षणशास्त्राचा त्यांचा अभ्यास फार सखोल होता हेही नजरेस आले. त्यामुळे अखेरीस सेवासदनची कायम नोकरी सोडून हडसांकडे मी आलो. सेवासदनाला सर्व गोष्टींची अनुकूलता, तर हडसमध्ये उद्या काय हे प्रश्नचिन्ह. पण हडसमध्ये आल्याचा मला कधीच पश्चात्ताप आला नाही व माझे नुकसानही झाले नाही. संस्थेबरोबर बरेवाईट दिवस काढीत शेवटी आज निदान कर्तव्यपूर्तीचे समाधान मला मिळत आहे.

हडस शाळेत आल्यानंतर दुसऱ्याच वर्षी मला सुपरिंटेंडेंट नेमण्यात आले. संस्थेच्या घटनेमध्ये तशा जागेची तरतूद आहे. त्या पदावर असलेल्या व्यक्तीला प्राचार्यांना सर्व कामांत मदत करणे हे आहे. प्रत्यक्षात मात्र शाळेची अंतर्गत व्यवस्था पूर्णपणे त्याला सांभाळावी लागते. शाळेची शिस्त अभ्यास या सर्व गोष्टी त्याने पाहाव्यात व प्राचार्यांना बाहेरील कामे करण्यात मोकळीक द्यावी असा संकेत पाडण्यात आला. नवोदित शाळेला बाहेरची कामेच फार असतात. शाळेला लागणारा पैसा उपलब्ध करून देणे, अधिकाऱ्यांशी संपर्क ठेवणे, नवीन गोष्टी शाळेत कशा आणता येईल इकडे लक्ष ठेवणे, एक ना दोन.

अंतर्गत व्यवस्थेमध्ये अनेकांची नाराजी संपादावी लागते. पण मला आनंद वाटतो ह्या गोष्टीचा की माझ्या ह्या बावीस वर्षांच्या कारकिर्दीत मला प्राचार्यांचे नेहमीच पूर्ण सहकार्य लाभले. माझ्या अधिकार-क्षेत्रात कधीच हस्तक्षेप करण्यात आला नाही. त्यामुळे शाळेच्या विशाल भव्यरूपाबरोबरच शैक्षणिक पातळीही आम्ही उंचावू शकलो. असो

१९४८ सालापासून शालान्त परीक्षेचे निकाल एकसारखे उत्तम होऊ लागले. त्या दृष्टीने ते वर्ष शाळेच्या वैभवाची मुहूर्तमेढ ठरले. पण त्याच वर्षी शाळेवर मोठे गंडांतर आले. न्यायालयाचा निकाल विरुद्ध लागून शाळेच्या इमारतीचा तावा धरमालकाने घेतला. शाळा बेघर झाली. उन्हाळ्याचे दिवस होते. श्री. हडस त्यावेळी भिवापूरला समाजशिक्षणाचे कार्य करीत होते. लहान-मोठे शिक्षणाधिकारी त्या शिबिराला भेट देत होते व इकडे शाळेला जागा नाहीशी झाली, कोणी मदतीला येईना, जागा मिळेना, सहानुभूतीच्या ऐवजी उपहास होऊ लागला. पण 'केला जरी पोत बळेची खाले, ज्वाला तरी ते वरती उफाळे.' काय होईल ते होवो, शाळा बंद ठेवावयाची नाही हा आम्ही निर्णय घेतला. शाळेला जागा मिळवून देण्याकरता काही सुहृदांनी अहेतुकपणे आटा-पिटा केला, पण व्यर्थ. यावेळी मला श्री. लपालिकर, श्री. शं. वा. शास्त्री ह्यांनी केलेल्या पायपिटीची आठवण येते. असो.


अखेर जागा मिळाली नाही, पण जुलै दोनला शाळेचे सर्व वर्ग सुरू झाले. हायस्कूलचे वर्ग श्री. हडसांच्या लहानशा घरात दाटीवाटीने भरत. मिडल-स्कूलचे काही वर्ग मोदी नं. १ मधील म्हसकरांच्या वाड्यात, काही स्काऊट ऑफिसच्या व्हरांड्यात, तर एक वर्ग अक्षरशः उघड्यावर, पटवर्धन मैदानावर भरू लागला.

बऱ्याच वेळा हायस्कूलचे वर्ग सकाळी श्री. हडसांनी झाडून काढावेत व १०.३०ला प्रिन्सि-पॉलच्या रुबाबात प्रार्थनेला हजर राहावे असा प्रकार असे. स्काउटच्या व्हरांड्यात भरणाऱ्या वर्गाचे विद्यार्थी सकाळी ६.३०ला येत, स्वतःच बाक, डेस्क लावीत व ११.०० वाजता पुनः सर्व फर्निचर उचलून ठेवून घरी जात.

पुढच्या वर्षी श्रीमती नानीबाई तालुकदार ह्यांनी शाळेला ७००० रु. कर्ज दिले व त्या रकमेतून तरुणभारत कार्यालयाचे मागे जागा घेण्यात आली व तिथे तट्ट्याच्या झोपड्या उभारण्यात आल्या. त्या झोपड्यांत मिडलस्कूलचे वर्ग भरत. त्यामुळे त्रिस्थळी याचेऐवजीं आता द्विस्थळी शाळा सुरू झाली. मुलांची संख्या सारखी रोडावत गेली. पण नवल हेच की अशा अवस्थेतही काही शिक्षक व मुले शाळेला चिकटून राहिली. श्री. म्हसकर व श्री. परांडे हे त्यांना वेळोवेळी इतरत्र चांगल्या जागा मिळत असताना सुद्धा निव्वळ ध्येयवादाने शाळेला धरून राहिले. नंतर श्री. मुळे १९५१ साली आले. हा निष्ठावंत शिक्षकांचा संच व तितकेच निष्ठावंत विद्यार्थी ह्यांच्यामुळे शाळा नाकाशी सूत धरलेल्या अवस्थेत का होईना पण जिवंत राहिली व आपले स्वतःचे वैशिष्ट्य टिकवून राहिली. नागपुरात होणाऱ्या अनेकविध शैक्षणिक चळवळींचे केंद्र हडस शाळा बनली. शिक्षकसंघाची सुरुवात होण्याला ज्यांची प्रेरणा कारणीभूत झाली त्यात श्री. हडस होतेच. मुख्याध्यापकांचाही संघ निर्माण झाला. नागपुरातील सर्व शाळांचे सामुहिक संचलन वगैरे कार्यक्रम सुरू झाले व त्याचीही सूत्रे याच शाळेतून हलत.

शाळेचा शिक्षणांतील दर्जा जरी चांगला असला तरी जागेच्या अभावी विद्यार्थ्यांची संख्या सारखी

रोडावत चालली, शाळेचा विकास खुरटल्यासारखा झाला. आर्थिक ओढाताण फार होऊ लागली. या कठीण प्रसंगी श्रीमती गंगाबाई गोखले यांनी शाळेला १००० रु. देणगी देऊन फार मदत केली. पण हा महिना निभला, पुढच्याचे काय, हा प्रश्न सारखा भेडसावीत होता. श्री. हडसांची कल्पना की आपण एक फार उत्तम सामाजिक सेवा करीत आहोत तेव्हा समाजाने आमचा भार थोडावहुत उचलावा. दुसऱ्याला आर्थिक मदत तर मागावयाची नाही व शाळेची फी व सरकारी अनुदान यात खर्च तर वसत नाही. अशा ह्या आर्थिक हलाखीचा व सतत ओढाताणीचा परिणाम होऊन १७ ऑगस्ट १९५२ रोजी श्री. हडसांचा देहान्त झाला.



कै. बापूसाहेब हडस यांच्यासह त्यावेळचा शिक्षकवृंद : सन १९५०

शाळेवर वज्राघात झाला. शाळेजवळ स्वतःची इमारत नाही, एक प्लॉट होता पण त्यावर कर्ज झालेले, विद्यार्थी संख्या जेमतेम १५०च्या घरात, शिक्षकांना कैक महिन्यांत पगार नाही. शाळेला आश्रयदाते नाही व आता तर शाळेचा एकमेव आधारस्तंभ गेला. शाळा आता राहात नाही ही सर्वांचीच खात्री. स्मशानात श्री. हडसांना अग्नी देताना त्यांची स्तुती खूप झाली. शाळेला मदत करण्याची काही आश्वासनेही दिली, पण ती तेवढ्यापुरतीच. त्याचवेळी शाळेचे शिक्षक सर्व माझ्या पाठीमागे उभे राहिले व त्यांच्या हिंमतीने मी तिथे बोलून गेलो की मी जिवंत असेपर्यंत शाळेला कुलूप लागू देणार नाही ! परमेश्वरानेच हे शब्द माझ्या तोंडून वदवले असे आता वाटते. काय होते माझ्याजवळ ? ना पैसा, ना शिक्षणक्षेत्रांत कमाविलेले नाव, ना प्रथितयश कर्तृत्व !! काही काही नव्हते ! होती प्रबळ जिद्द. कै. हडसांचे श्राद्ध होण्याचे अगोदरच हडस शाळा इतर शाळांत विलीन करून टाकण्याबद्दल सारख्या सूचना येऊ लागल्या. हडस वारल्यानंतर मला वाटते पाचव्या दिवशी शाळा सुरू झाली, तेव्हा श्री. अप्पासाहेब जोशी शाळेत आले. त्याच्यापूर्वी मी त्यांना एकदोनदाच पाहिले होते. त्यांचेविषयी ऐकले होते मात्र खूप. त्यांनी मला आपुलकीने काही मदत पाहिजे काय म्हणून विचारले. मदतीकरता पुढे आलेला हा पहिला हात. त्याचे विषयी बऱ्याच अनुकूल, प्रतिकूल गोष्टी ऐकल्यामुळे मी त्यावेळी त्यांना काहीच निर्णयात्मक उत्तर दिले नाही. त्याचवेळी इतर काही कर्तबगार लोकांकडून शाळा चालविण्याबद्दल सूचना (offers) आल्या. संस्थेचे अध्यक्ष कै. दादासाहेब शेवडे, कै. मंगळमूर्ती वगैरे थोर लोकांचा सल्ला घेतला. हडसांचे निकटवर्ती मित्र श्री. ताम्हने व श्री. गं. सा. सहस्रबुद्धे ह्यांचाही सल्ला घेतला. माझ्यापुढे दोन पर्याय होते. शाळेचे मजकडे चालून आलेले प्रमुखपद स्विकारावे व शाळा स्वतः चालवावी किंवा दुसरा कर्तबगार कर्णधार निवडावा. मनाचा फार गोंधळ उडाला. शाळा चिरंजीव करावयाची असेल तर स्वतःचे कर्तृत्व अपुरे पडेल ही भीती, तर नवीन मनुष्य आला, शाळा चांगली चालली तर आपणाला जावे लागेल व हडसांचे नाव शाळेला राहीलच ही शाश्वती नाही, ही भीती ! अशा अवस्थेत माझे मित्र व सहकारी श्री. बापुसाहेब परांडे यांच्या सल्ल्याने मी सर्व शिक्षकांची सभा घेतली; सर्व गोष्टी त्यांच्या पुढे अगदी स्पष्ट मांडल्या. त्यांनी एकमुखाने मला अगदी कोरा चेक दिला. सर्व शिक्षकांच्या विशेषतः सर्वश्री परांडे, म्हसकर, मुळे यांच्या सर्वसाधारण मताचा कानोसा मला लागल्यामुळे मी मनाशी काही निर्णय घेतला व रात्री श्री. अप्पासाहेब जोशी यांचेकडे गेलो.

१९५२ साली शाळेच्या हजेरी पटावर १२५ मुले होती, आज १२५० मुले आहेत. शाळेने महाराष्ट्रात आपल्या करता एक महत्त्वाचे स्थान मिळविले आहे.

सत्य संकल्पाच्या मागे परमेश्वर उभा असतो याचा प्रत्यय आज येत आहे.

आज ही शाळा नागपुरातील अग्रगण्य शाळांत एक आहे. स्वतःची भव्य इमारत आहे, सबंध महाराष्ट्रात कोणत्याही शाळेला नसलेले पोहोण्याचे टाके आहे. शाळेच्या भोवतालचे वातावरण उत्तम शिक्षण व ज्ञान प्रदानाला अनुकूल आहे व अनुभवी शिक्षकांचा संच आहे. इतर शाळांतून आपल्या पेक्षाही जास्त अनुभवी व ज्ञानी शिक्षकांचा संच आहे, पण आमच्या शाळेतील शिक्षकांच्या मनात आपल्या पेशाबदल जो अभिमान आहे व आपला दर्जा नेहमी उंच ठेवण्याची जी तळमळ आहे ती जवळ जवळ अजोड आहे.

शिस्त प्रियता हा या शाळेचा स्थायीभाव आहे. प्रत्येक गोष्ट ती सकाळची प्रार्थना असो, की सभा असो अगदी वेळेवर घड्याळाच्या ठोक्यावर सुरू झाली पाहिजे ही इथली रीत आहे. शाळेची रोजची उपस्थिती नेहमीच ९५ टक्याच्या वर असते. एखादा दुसराच विद्यार्थी शाळेच्या गणवेषात न आलेला आढळेल. शिस्त म्हणजे उत्तम वळण, व असे उत्तम वळण म्हणजेच खरे शिक्षण. या शाळेची उत्तम शिस्तशीर शाळा म्हणून जी ख्याती आहे ती तिच्या शैक्षणिक वैभवाच्या मुळाशी आहे ही माझी धारणा आहे.

ह्या रोपट्याने आता चांगला जोम धरला आहे व त्याचा दिवसेदिवस सारखा विकासच होत जाणार ही खात्री आहे. अस्तु.



विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या
'राजकन्या भिकारी' या नाटकातील एक दृश्य

शाळेच्या प्रगतिपथावरील काही टप्पे

श्री. पु. रा. जोशी,
प्राचार्य, हडस हायस्कूल

कै. वापुसाहेव हडस यांनी जुलै १९४२ साली शाळेची सुरुवात केली. ६ ऑगस्ट १९४२ ला तात्पुरती सरकार मान्यता मिळाली. त्यावेळी विद्यार्थ्यांची एकूण संख्या ३५० होती.

●

हडस हायस्कूलचे संचालन ज्या लिबरल एज्युकेशन सोसायटी तर्फे सुरू झाले ती सोसायटी, सोसायटीज् रजिस्ट्रेशन अक्ट (XXI of 1860) खाली ता. २२ मार्च १९४३ ला रजिस्टर झाली.

●

पाच सहा वर्षे शाळा श्री. परांडे यांचा बंगला, स्काऊट हेडक्वार्टर्स, खांडेकर यांचा बंगला धंतोली व म्हसकरांचा वाडा, सीतावर्डी या ठिकाणी भरत असे.

●

१९४९ साली फार्मलँड तरुणभारत प्रेसच्या मागे शाळेकरिता ट्रस्टचा एक प्लॉट रु. १०००० किंमतीचा व शेकडा ६ व्याजाचा घेण्यात आला. हा प्लॉट घेण्यास श्री. नानीबाई तालुकदार यांनी सातहजार रुपये कर्जाऊ दिले.

●

१९५० मधे शाळेच्या चार अस्थायी खोल्या बांधण्यात आल्या. कौलारू छप्पर व भिती तट्टयाच्या होत्या.

●

१९५२ साली वापुसाहेव हडस १७ ऑगस्टला निधन पावले. व श्री. पी. आर. जोशी यांना शाळेचे प्रिन्सिपाल व मॅनेजर नेमण्यात आले. त्यावेळी शाळेत एकूण १५८ विद्यार्थी होते. १९५३ मधे शाळेच्या फार्मलँडमधील प्लॉटवर दोन खोल्या वाढविण्यात आल्या. कंपाउंड लावले व विहीर खणली. कुडाच्या भिती बांधून धंतोलीवरील खांडेकरांच्या बंगल्यातून ऑफीस बदलविले.

●

खांडेकरांच्या बंगल्याचे दरमहा रु. १२० भाडे व नवीन प्लॉटचे दरमहा ५० रु. ग्राउंडरेंट व जागा रेसिडेंशियल यामुळे शाळेला दुसरी जागा पहाणे अपरिहार्य होते.

●

१९५३ मधे १७ सप्टेंबरला उत्तर अंबाझरी मार्गावरील नझुलच्या १.९० एकर असलेल्या जागेकरिता अर्ज केला.

●


शाळेच्या प्रगतिपथावरील टप्पे—



भूमिपूजन



तारेचे कुंपण घालताना



भराईचे गोटे हलविणे

१९५४ मधे २ नोव्हेम्बरपर्यंत बँक ऑफ महाराष्ट्र मधे बिल्डींग सब कमिटीच्या नावाने रु. २००१ रोख, रु. २५००० गव्हर्नमेंट सिक्युरिटीज् नं. BY 001678 ठेवण्यात आल्या. १८–१–१९५५ ला बँकेत एकूण ऐवज रु. ४६५०१ जमा झाला.


१९५६. शाळेला १.९० एकर अथवा ८२७४०० चौ. फूट जागा मध्यप्रदेश सरकारने कायम लीजवर नाममात्र ३० रु. वार्षीक रेंटवर दिली. ६ जून १९५६ रोजी लिबरल एज्युकेशन सोसायटीच्या नावाने जागा रजिस्टर झाली.

शाळेला मिळालेली जागा ताब्यात घेऊन भूमिपूजन करून कामास सुरुवात केली. प्लॉटवर गोखूरचे रान व सागाची झाडे होती. जागा साफ करणे, खळगे भरून काढणे, झाडे तोडणे ही सर्व कामे मुलांनी हौसेने केली.


जागेभोवती तारेचे कुंपण घालण्याचे संपूर्ण काम विद्यार्थी व शिक्षकांनी केले.

१९५७ साली मिळालेल्या जागेत प्रथम स्विमिंगपूल बांधण्यास सुरवात केली. जागा खणणे, भराई करणे, बिटा पुरविणे इत्यादि श्रमदानाची कामे मुलांनी केली. श्रमदानांत सरस्वती विद्यालय, धरमपेठ हायस्कूल, सोमलवार हायस्कूल यांनीही काही मदत केली.

१९५७ च्या शेवटी स्विमिंगपूल बांधून तयार झाला. याची लांबी ७५ फूट, रुंदी ३० फूट व ज्यास्तीत ज्यास्त खोली १० फूट आहे. स्विमिंगपूलचा आराखडा कै. भास्कर विष्णुपंत साठे



स्विमिंग पूलचे उद्घाटन माननीय श्री. भगवंतराव मंडलोई, शिक्षणमंत्री, मध्यप्रदेश, यांच्या हस्ते



शाळेच्या खरे हॉलचे उद्घाटन करताना माननीय श्री. शेषराव वानखेडे



प्रेक्षकांसह खरे हॉल

इंजिनिअर यांनी तयार केला व त्यांचे वडील विष्णुपंत उर्फ मामासाहेब साठे इंजिनिअर यांनी विनामूल्य देखरेख केली. एकूण खर्च रु. ३८५२९–५९ आला. विद्यार्थी प्रेक्षकांसाठी स्वतंत्र गॅलरी व कपडे बदलण्याच्या खोल्या व स्नानगृहे बांधण्यात आली. सरकारने Campus Work Project योजनेनुसार १८००० रु. अनुदान दिले. ३००० रु. श्रमदान शिक्षक व मुले यांनी केले व बाकीची रकम सोसायटीने खर्च केली.

१९ एप्रिल १९५७ मधे स्विमिंगपूलचे उद्घाटन माननीय भगवंतराव मंडलोई शिक्षणमंत्री मध्यप्रदेश यांनी केले.

●

१९५८ साली शाळेचा रिक्रिएशन हॉल बांधण्यात आला. याला एकूण खर्च रु. ७८४१३–१७ आला. या कामाला मध्यवर्ति सरकाने रु. ३५००० चे अनुदान दिले व श्रीमती यशोदाबाई खरे यांनी रु. १५००० देणगी दिली. सोसायटीने रु. १८००० खर्च केला. रिक्रिएशन हॉलला खरे हॉल नाव देण्यात आले. या हॉलचे उद्घाटन ११ आक्टोबर १९५८ रोजी माननीय शेषराव वानखेडे प्लॅनींग व डेव्हलपमेंट मंत्री यांनी केले. शाळेच्या प्रशस्त हॉलमधे सभा, संमेलने व चित्रपट दाखविणे शक्य झाले आहे.

●

१९५८ याचवर्षी शाळेला मुंबई सरकारकडून शाळेच्या जागेला लागूनच असलेली ०.५१ एकर अथवा २२३१४ चौ. फूट जागा मिळाली. या जागेचे रजिस्ट्रेशन सोसायटीच्या नावाने ६ मार्च १९५८ रोजी झाले. १९५८ साली संक्रातीला फार्मलँडमधील शाळा हलवून नवीन जागेत आणली व सर्व शाळा या जागेत भरू लागली.

●

१९५८ मधे शाळेच्या पहिला मजला, ऑफीस व शिक्षकांची खोली तयार झाली व मध्यप्रदेश सरकारकडून रु. २१८६४ अनुदान मिळाले. एकून खर्च रु. ११४०००–०० आला. याच वर्षी शाळेच्या जागेत विहीर खणली. एकून खोदाई व बांधण्याचा खर्च रु. ७५२७ आला. विहिरीवर विजेचा पंप बसविण्यात येऊन विहिरीचे पाणी स्विमिंगपूलमधे घेण्याची सोय झाली.

●

३ जुलै १९५९ ला शाळेला कायमची सरकारमान्यता मिळाली.

●

१९६० ला शाळेचा दुसरा मजला बांधून पूर्ण झाला. एकूण खर्च ९४७००–०० आला. दुसरा मजला बांधण्यास महाराष्ट्र सरकारने ३५००० रु. कर्जाऊ दिले.

●

१९६१ मधे शाळेच्या इमारतीचा तिसरा मजला बांधून पूर्ण झाला. याला एकूण खर्च रु. १३०९५७–०० आला. शाळेच्या संपूर्ण इमारतीचा आराखडा व प्लॅन कै. भास्कर विष्णुपंत साठे, इंजिनिअर व आर्किटेक्ट यांनी नाममात्र रकम घेऊन तयार केला व शाळेच्या संपूर्ण इमारतीचे बांधकाम श्री. विष्णुपंत साठे, इंजिनिअर यांच्या देखरेखीखाली झाले. त्यांनी शिक्षण संस्थेला मदत



रामचंद्र दांडेकर, हेडप्यून

म्हणून एकूण काम विनामूल्य केले. त्यांची निरलसता, प्रामाणिकपणा, काम करण्याची हातोटी व वृत्तीचा साधेपणा यामुळे सर्वांनीच काम उत्साहाने केले व त्यामुळेच काम शक्य तितक्या लवकर बांधून झाले.

शाळेची मोठी इमारत बांधणे अत्यंत खर्चाचे व कष्टाचे काम. पण या कामांत कारागीर किसन कोंडावार व सुताराचे काम करणारा लक्ष्मण मोरवाजी गोडे या दोघांनी फार छान काम केले. त्यांचा कामाचा हात चांगला. दोघेही कामात निष्णात. पैसे घेऊन देखील चांगले काम करणारे सापडत नाहीत. या दोघांप्रमाणे रामचंद्र दांडेकर यांनी सिमेंट आणणे इतर देखरेख करणे ही कामे शाळेच्या कामाव्यतिरिक्त मोठ्या आनंदाने केली. बँकेची कामे करण्यात व चोख व्यवहार करण्यात त्याचा हातखंडा आहे. कामगार उत्तम मिळणे हे देखील भाग्यच !

शाळेची तीन मजली इमारत बांधण्यास एकूण खर्च ३,३९,६५७ रु. आला. इमारतीचे उद्घाटन १३ ऑगष्ट १९६३ रोजी माननीय शांतीलाल शहा शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी केले.



शाळेच्या उद्घाटनप्रसंगी माननीय शांतिलाल शहा

१९६५ साली लिबरल एज्युकेशन सोसायटीला तेलंखेडी जवळच्या टेकडीवर १२ एकर जागा महाराष्ट्र सरकारने नाममात्र भाडेपट्टीने कायम लीजवर दिली. तेथे हल्ली केंद्रीय विद्यालयाच्या इमारती आहेत.

●

१९६६ साली पहिल्या विहिरीला कायमच पाणी नसल्यामुळे दुसरी विहीर खणली व विजेचा पंप बसविला एकूण खर्च ९४०० आला.

●

६ ऑगस्ट १९६७ ला शाळेला २५ वर्षे पूर्ण झाली. रजतमहोत्सवाच्या निमित्ताने तीन खोल्या बांधण्यास सुरवात झाली. पैकी मुलांसाठी लायब्ररीरूम, वायालॉजी रूम व एक वर्गाची खोली बांधून झाल्या.

●

हडस हायस्कूल मधे एकूण विद्यार्थी ११६९ आहेत व त्यांपैकी मुली ३७० आहेत.

●

हडस हायस्कूलची तीनमजली इमारत, स्विमिंगपूल, व खरे हॉल बांधत असताना अनेकांचे सहाय्य झाले. काहींनी माल फुकट पुरवला, कांहीनी पैशाची मदत केली पण नाव प्रसिद्ध करू नका असा आग्रह धरला. हे सर्व होत असताना ऑफिस काम संभाळून प्रत्येक कामात मदत अगदी मनापासून मदत केली असेल तर ती श्री. वामनराव जोशी व श्री. हरिभाऊ लाडकर यांनी. कोणतेही ऑफिसचे काम असो श्री. जोशी सदैव हसतमुखाने तयार. शाळेचा वालचमू, रेडक्रॉस, शाळेचे मुलांचे दुकान, शाळेच्या मुलाकडून सरबते तयार करून विकणे अशा तऱ्हेची विविध कामे मुलांचा अभ्यासक्रम संभाळून श्री. हरिभाऊ लाडकर करतात. अत्यंत कष्टाळू, प्रामाणिक, कोणतेही शाळेचे काम करण्यास हंसतमुखाने सदैव तयार. अत्यंत निष्टावंत शिक्षक. त्यांच्या कामाला तोड नाही. त्यांच्या कामाचा गौरव करावा तेवढा थोडा.

●

शाळेचे हित सदैव जपणारी अशी दुसरी व्यक्ती म्हणजे श्री. गोविंदराव परांडे. शाळेचे कोणतेही काम असो ते करण्यास सदैव तत्पर. प्रसिद्धीपराङ्मुख, आदर्श शिक्षक, व कोणत्याही प्रश्नाचा निःपक्षपाती विचार करण्याची मनाची ठेवण. त्यांचे जीवन हे एक आदर्श सेवावृत्तीचा नमुना.

●

शाळेच्या इमारतीचे काम असतांना शिक्षकांकडे लक्ष देणे, शिस्तीचे पालन होते किंवा नाही हे पहाणे हे काम श्री. द. वि. भिडे यांनी केले. शाळेतील शिक्षण विषयक सर्व कामे त्यांनी निष्ठेने केल्यामुळेच मला बाहेरील काम करण्यास अवसर मिळत असे.

●

शाळेच्या विविध योजना पूर्ण होण्यास बहुजनसमाजाने फार मदत केली. त्यांच्या मदतीशिवाय काहीच सफल झाले नसते. अनेकांनी केलेल्या मदतीने मन भारावून येते. चांगले काम करण्यास सर्वच मदत करतात हेच खरे.

शाळेच्या प्रगतीस अनेकांनी मदत केली. एस्. टी. सी. वर्ग श्री. जे. एम्. देशपांडे यांनी उतारवयात तरुण शिक्षकांना लाजवील अशा तडफेने केले.

शिक्षक व कर्मचारी १९६७–६८

माजी विद्यार्थ्यांच्या काही सुखद आठवणी

दूर गावी राहणाऱ्या मुलाला आईच्या हातचा खाऊचा डबा मिळावा तसलाच काहीसा आनंद आपल्या पत्रानी आज मला झाला. माझी आठवण आपल्याला अद्याप आहे हे वघून झालेला आनंद व्यक्त करण्याला शब्द अपुरे वाटतात. आपल्या पत्रानी वीणेवर हात फिरविताच जसे संवादी सूरांचे कंपन सुरू होते तसेच आज मला होत आहे.

१९६१ ते ६३ या दोन वर्षांचा कालावधी माझ्या जीवनाला नवीन दृष्टी देणारा ठरला. शाळेत प्रवेश करिताना माझ्या भावना व शाळेतून वाहेर जाताना माझ्या भावना यात कितीतरी महदन्तर वाटते. एकाच गणवेशात सर्वांनी यावे ही आपल्या शाळेची शिस्त प्रथम मला कशीतरी वाटली पण नंतर मात्र ती अंगवळणी पडली व मला पटू लागले. आपण वाह्य कपडयाकडे न वघता आपले मन अभ्यासाकडे लावावे असेच हा गणवेश सांगत आहे. आपण सर्व विद्यार्थी एकाच जातीचे आहोत; कोणी श्रीमंत नाही वा कोणीही गरीव नाही. हेच दाखविण्याला हा गणवेश आवश्यक वाटतो.

शाळेचे मुख्य आकर्षण मला तरी 'स्विमिंग टँक 'चे होते. मला त्यामुळे पोहता आले हीच गोष्ट मला लाख मोलाची वाटते. माझे मन जेव्हा कशातच रमत नाही तेव्हा मी पोहावयाला जातो; आणि आश्चर्य हे की पोहून झाल्यानंतर मी एक वर्षाने तरुण होतो. पुनश्च ताजातवाना होऊन नवीन उत्साहाने कामाला लागतो. पाण्यातील ही जादू आज मला समजत आहे. पाण्याचे अंथरूण व पाण्याचेच पांघरूण अनुभवितांना हडस हायस्कूलची स्मृती मनाला उजाळा आणते. मी आपल्या विद्यालयाला विसरू शकेन कसा ? वालक आपल्या मातेला विसरू शकतो का ?

शालेय जीवनात मला विज्ञान, रसायन व गणिताची वाटणारी भीती श्री. सहस्रवुद्धे गुरुजींमुळे पार निघून गेली; त्यांनी मला त्या विषयांत अभिरुची निर्माण केली हे कृतज्ञतापूर्वक सांगावेसे वाटते. आमच्या सौ. केसकर वाईंना मी कधीच विसरू शकत नाही. हिंदी व संस्कृत त्यांनीच मला शिकविले. त्यांनीच मला उत्तेजन दिले; कधी पाठ थोपटून तर कधी वडवून त्यामुळेच मला शालान्त परीक्षेत उत्तम गुण लाभलेत; त्यांच्यासारखी मातृतुल्य माया आज मात्र मला लाभू शकत नाही. परीक्षेपूर्वीचा माननीय भिडे गुरुजींचा कर्मठपणा व परीक्षेनंतरचा कोमलपणा आम्हा विद्यार्थ्यांना अत्यंत विलोभनीय वाटतो; आणि वाटते पुनश्च त्यांनी रागवावे याकरिता तरी शाळेत जावे. त्यांच्या रागाच्या पोटी ममता वास करीत असे याचा प्रत्यय आज मला येतो. मराठीचे परांजपे गुरुजींचे शिकविलेले पाठ अद्याप मला भूतकालात नेतात. खपली निघताच जसा व्रण वाहू लागतो तसेच आज मला होत आहे. शाळेच्या अनेक स्मृतींनी जणू मी न्हाऊन निघत आहे.

माझ्या हडस हायस्कूलला २५ वर्षे पूर्ण झालीत हे वाचून मला अत्यानंद झाला आहे. शाळेची उत्तरोत्तर उन्नती व्हावी व मला सेवा करण्याची संधी लाभावी हीच इच्छा. आपले सर्वांचे मी अभिनंदन करतो. माझे मनोगत व्यक्त करण्याची संधी मला लाभली याबद्दल मी आपला सर्वांचा आभारी आहे. सर्व गुरुवर्यांनी माझ्यावर लोभाचाच वर्षाव करावा ही अपेक्षा.

सतीश घोडकी
मेडिकल कालेज,
तृ. वर्ष, एम. बी. बी. एस.

माझ्या शाळेचा रौप्यमहोत्सव होणार हे वाचून अत्यानंद झाला. आज आपल्या शाळेचे भव्य रूप पाहून पंधरा वर्षापूर्वी ती केवढी लहान होती हे कोणाला सांगूनही खरे वाटणार नाही. सागराला मिळणाऱ्या गंगेचा बहुधारी प्रवाह बघितल्यावर गंगोत्रीचे स्वरूप जर कोणी गंगेचे सांगू लागला तर त्याला कसे वाटेल ?

शाळेच्या शिस्तीचा व वक्तशीरपणाची अद्याप मला आठवण येते. प्रार्थनेला येण्याला थोडा जरी उशीर झाला तरी वेगळी रांग असे व प्रत्येकाला एक एक छडीचा प्रसाद मिळे; अशी प्रसाद भक्षणाची वेळ माझ्यावरही आली होती. पण तेव्हापासूनच वक्तशीरपणा हा गुण माझ्यात आला आहे. त्याच गुणांनी एक नव्हे पण श्रेयस्कर वळण माझ्या जीवनाला मिळाले. माझ्या जीवनावर चिरंतन परिणाम घडविणाऱ्या शाळेचा मला अभिमान आहे. तिचा उत्तरोत्तर उत्कर्ष व्हावा हीच प्रभुचरणी प्रार्थना.

जयंत घारपुरे, एम्. एससी.
रिसर्च बायोकेमिस्ट, ग्रँड मेडिकल कॉलेज, मुंबई.

कृतज्ञता

मिडलस्कूलमध्ये अध्ययन करीत असतानाच मी मॅट्रिकचा निकाल बघत असे. मेरिटमध्ये येणाऱ्या मुलांचे मला कुतूहल वाटे. प्रथमश्रेणीत प्रथम येणाऱ्या मुलांचे फोटो मी बघत असे; याच वेळी माझ्या आईनी तुझाही फोटो वर्तमानपत्रात येईल पण मनापासून मात्र अभ्यास कर असे मला सांगावे. मेरिटमधील अनेक मुलांत मला हडस हायस्कूलचे नाव अनेक वार दिसे. त्यामुळे मला त्या विद्यालयाबद्दल कुतूहल वाटू लागले आणि पुढच्याच वर्षी मी हडस हायस्कूलमध्ये दाखल झालो.

माझ्या महत्वाकांक्षेला योग्य भूमी लाभली. येथील शिस्तबद्ध पण आनंदी वातावरण बघून आपण चूक केली नाही असे मला वाटू लागले. अध्यापकांच्या प्रेमळ वागणुकीने व प्रभावी मार्गदर्शनाने मी प्रभावित झालो. हडस हायस्कूलमधील संस्कार माझ्यावर चिरंतन परिणाम घडवू लागले. आजही आपण हडस हायस्कूलमध्ये जाऊन बसावे असे मला वाटते. येथील सुसंस्कारांनीच माझ्या जीवनाला वळण दिले असे मला वाटते.

येथील सर्व शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन मला लाभले. त्यातल्या त्यात श्री. भिडे गुरुजींचे इंग्रजी विषयाच्या अध्यापनाचे कौशल्य श्री. वसंतराव पाठक गुरुजी यांचे मराठी-संस्कृत विषयाचे अध्यापनकौशल्य मी कधीच विसरू शकत नाही. एका संथलयीत श्लोक-शब्द व धातूंचे उच्चारण आमच्याकडून ते करून घेत. मराठी ही माझी मातृभाषा नसताही त्यात प्राविण्य संपादण्याला व अभिरुची निर्माण करण्याला श्री. पाठक गुरुजी यांचेच मार्गदर्शन मला प्रेरक झाले. सर्व गुरुजनांच्या सदिच्छा मागे नसत्या तर मला हे यश मिळू शकले नसते.

१७–९–६७ **दिलीप मोदी**

'या झोपडीत माझ्या'

जुन्या रामदास पेठेतील एका झोपडीत 'या झोपडीत माझ्या' हे गाणे मी अनेक वेळ म्हटले असेल. धनिकांना–राजेमहाराजे यांनाही जे लाभू शकणार नाही असे जीवनाचे पाठ आम्हा विद्यार्थ्यांवर तेथे घडत होते. पावसाळ्यात वर्ग सुरू असता अंगावर पाणी गळत असताही व अक्षरशः आम्ही ओलेचिंब होत होत असताही आम्ही विद्यार्थी श्रद्धेने व निष्ठेने गुरुजनांचे पाठ घेत होतो. या अनुभवांना सुद्धा भाग्य लागते, असे त्यावेळी आम्ही परस्परात बोलत होतो.

प्राचीन काळी आश्रमपद्धतीने शिक्षण चालत असे. अध्यापन करणारा अध्यापकवर्ग तन्मयतेने व तळमळीने आम्हाला शिकवीत असे. अनेक महिन्यांचे पगार झाले नाहीत हे आम्हा विद्यार्थ्यांनाही कळत असे. पण एकाही शिक्षकाने कधीही फळा खडू बंदचा प्रयोग केलेला आम्हाला स्मरत नाही. 'की घेतलें व्रत न हे अम्हि अंधतेने' ही निष्ठा मनाशी बाळगून विद्यार्थीवर्गावर संस्कार घडविणाचे पावनकार्य त्या वेळी झाले म्हणूनच 'पूर्व दिव्य ज्यांचें त्यांना रम्य

भावि काळ' या विनायकाच्या उक्तीप्रमाणे आज शाळेला वैभवाचे दिवस आलेले आहेत.

आमच्या शाळेचा भूतकालीन प्रवाह मंदमंदपणे वाहणारा असेल पण तो गंगेचा प्रवाह होता असे मोठ्या अभिमानाने सांगावेसे वाटसे. शिस्त, स्वावलंबन, सहिष्णुता, सेवाभाव यांचे प्रात्यक्षिक आम्हाला गुरुजनांकडूनच मिळत असे. त्यावेळी आमची शाळा धनाने गरीब होती पण मनाने मात्र ती खचित श्रीमान होती. पंधरा वर्षांपूर्वीचे शाळेचे स्वरूप प्रतिपदेच्या चंद्रकोरीप्रमाणे जरी क्षीण असले तरी तें निष्कलंक व पावन होते. त्या झोपडीत मला शिक्षणाचा लाभ मिळाला हे आज सांगताना मला अभिमान वाटतो. 'ते हि नो दिवसा गता:' असे मात्र आज म्हणावे लागते. आजही रामदास पेठेतील त्या जागेसमोरून मी जेव्हा जातो तेव्हा अनेक स्मृतिलहरींनी मला सुखसंवेदना निर्माण होतात; 'या झोपडीत माझ्या' हे कवन अभावितपणे मी गुणगुणू लागतो.

माझ्या जीवनावर चिरंतन परिणाम करणारा ओरखडा याच रामदासपेठेतील शालेय जीवनात निर्माण झाला. माझ्या मात्र मनाला तेच पंधरा वर्षांपूर्वीचे हडस विद्यालयाचें स्वरूप विलोभनीय वाटते. त्यावेळी सुद्धा अनेक मजली शाळांसमोरून आम्ही भटकत असू, पण आपली आई गरीब असली–फाटक्या पटकुरात असली तरी शेजारच्या श्रीमंत पतीच्या राणीपेक्षा तीच आपल्याला कां आवडते ? खऱ्या मातेची सर या श्रीमंत स्त्रीला कशी यावी ? अद्यापही तोच जिव्हाळा व तीच निष्ठा माझ्या मनात वास करते म्हणूनच मी हे लेखन करू शकलो.

अरुण जोशी, एम्. एससी
रिसर्च स्टुडंट

I was born on 27th October 1943. I came to Nagpur as a school boy. I started going to Patwardhan High School which I soon left. Then I joined the Hadas High School to which I still owe lot of respect and my most sincere regards. I remember I had a very pleasant time in Hadas High School. Swimming has been one of my hobbies and our school had a swimming pool. This is the school where I learnt good swimming under the guidance of Mr. Parande.

I passed my S. S. C. examination from Hadas High School in the year 1958 in first division with distinction in five subjects.



श्री. विजय जोशी

I joined Pre-university class in the Govt. College of Science. Now this was the time to think of the future seriously. When I was a child, I do not know why, I very much wanted to fly. I chose to join the Air Force. I passed the competitive examination for admission to the National Defence Academy and finally found myself in N. D. A. in January 1960. I Passed out from there in December 1962.

Then I reported to Air Force Flying College at Jodhpur. I flew 2 types of aircrafts. The H. T. 2 in the basic stage and a Harvard T6. G. in the intermediate stage. I passed out from Jodhpur with a total flying experience of 125 hours. I was sent to the Jet Training Wing. I flew Vampire aircraft there. The first solo in Vampire was very thrilling. Soon I fully qualified in this type of aircraft.

I was commissioned as an officer in the Indian Air Force on the 28th October 1963. I was posted to a Vampire Squadron in Poona. In the mean time the Air Force had selected some officers to be sent to England for a conversion course on to Hunter aircraft. I was one of the lucky ones to be selected. The course there was very good indeed. We were five officers in a batch. I stood first amongst those five. After completing the course we returned to our dear country in November 1964.

Now I am serving in the Indian Air Force. I played a little part in our recent operations against Pakistan.

Finally, I would say that our Air Force still needs lots of pilots. I am sure some young boys still in School would certainly like to join the Air Force and be on top of the world.

Vijay Joshi
Lt. Col., Flying Officer

हडस हायस्कूलच्या माझ्या शालेय स्मृती आज सुखस्वप्नाप्रमाणे वाटतात. १९५० साली मी हडस हायस्कूलमध्ये नाव घातले. माझा अभ्यास यथातथाच होता पण स्वर्गीय हडसांच्या आत्मीयतेने व अध्यापनचातुरीने माझी भीती दूर झाली. १९५० ते ५३ या चार वर्षात शाळेवर अनर्थाची परंपरा कोसळत होती. पैसा नाही, जागा नाही, स्थैर्य नाही; फक्त होते निष्ठावंत शिक्षक आणि श्रद्धाळू विद्यार्थी. कै. हडसांनी या दोन खांबांवरच आपले मनोरथ उभे केले. जेथे रिकामी जागा दिसेल तेथे वर्ग चालू होत. कधी पटवर्धन मैदानावर तर कधी स्काउटच्या रिकाम्या व्हरांड्यात. काही वर्ग श्री. म्हसकर यांच्या घरात भरत. पण त्या वेळच्या विद्यार्थ्यांनी संप, उपोषणें किंवा अन्य प्रकार मुळीच केले नाहीत. याला एकमेव कारण कै. हडसांविषयीचा अपार आदर आणि प्रगाढ प्रेम.

मी विशेष शिकू शकलो नाही पण स्वावलंबनाचे पाठ मात्र पुरेपुर शिकलो. स्वतःचे काम स्वतः करावयाला लाज कसली? रामदास पेठेत शाळेची एक झोपडी तयार झाली; त्या जागेभोवती कुंपण आम्ही विद्यार्थ्यांनी घातले. कै. हडस स्वतः कुदळ व फावडे घेऊन काम करू लागल्यावर आम्हाला लाज कसली. डोक्यावर मातीची टोपली वाहून नेलेत. त्यांवेळी हडसांनी आमच्या पाठीवरून हात फिरविला. अजूनही त्याचा सुखद स्पर्श माझ्या डोळ्यात आदराश्रु निर्माण करतो. १७ ऑगस्ट १९५३ रोजी हडसांना देवाघरचे निमंत्रण आले. पुढे दोन वर्षे मी न्यु इंग्लिश स्कूल मध्ये होतो, पण माझे मन तेथे रमेना. 'जुने तेच सोने' समजून मी पुनश्च हडस शाळेत दाखल झालो. यावेळी शाळा पतंगाप्रमाणे हवेवर झोते खात होती. श्री. जोशी, श्री. भिडे व श्री. म्हसकर यांच्याच अमोल त्यागाने आजचे दिवस बघावयाला मिळालेत हे कृतज्ञतेने मला म्हणावेसे वाटते. नियमितपणा व शिस्त हा शाळेचा स्थायीभाव होता. या शाळेविषयी आजही माझ्या मनात नितांत आदर आहे. आजच्या रजतमहोत्सवाच्या मंगल प्रसंगी स्वर्गीय हडसांच्या स्मृतींना मी अभिवादन करीत आहे. 'दिव्यत्वाची जेथ प्रतीती। तेथे कर माझे जुळती।।' या कवि बोरकरांच्या काव्यपंक्ती अभावितपणे मनात सहकंपन सुरू करतात.

दत्तकुमार नारायण वागळे
माजी विद्यार्थी, नागपूर.

शिक्षक, विद्यार्थी येतात आणि जातात. प्रवाहातले बिंदू बदलले तरी नदी तीच कायम राहते. या साऱ्या परिवर्तनामागे हडस हायस्कूलचे एकच एक व्यक्तित्व व भव्योदात्त परंपरा नाही काय ? दहा वर्षांनी इथे आल्यावर 'ही माझी शाळा' असा जिव्हाळा मला वाटणार नाही काय ? ह्या वास्तूभोवती माझ्या कटु-मधुर स्फूर्ती निगडित झाल्या आहेत. त्यातील कण न् कण या परंपरेचा इतिहास सांगतो आहे. हृदयाच्या गाभाऱ्यात ह्या गोड स्मृती खोल खोल जपून ठेवाव्या वाटतात; त्यातूनच व्यक्तित्वाला मिळणारे वळण मला येथेच लाभावे, हे अभिमानाने सांगण्याचा सुमंगल क्षण आज उगवला.

वर्ग ९ मध्ये असताना 'जय जवान जय किसान' हे गाण्याचे मधुर स्वर पुनश्च मला अनुभवता येतील का ? कु. इला पारसनीस, कु. अरूणा वोकारे,, व कु. चित्रा आमटे यांच्या तुफानी वक्तृत्वाच्या धबधब्यांनी मी स्तिमित मात्र होत असे. मदन कापरे व कोरडे यांचे कौशल्यपूर्ण पोहणे निरीक्षण करताना वेळ कसा संपे याचेच आश्चर्य वाटत असे. गाण्याची, वक्तृत्वाची व पोहण्याची स्पर्धा सुरू असता विजयाच्या कैफाने 'वक अप' म्हणून टाळ्या पिटणारे आम्ही विद्यार्थी ते आनंदाचे क्षण मात्र आज गमावून बसलो आहोत. आज मात्र 'साध्याही विषयात दिव्याशय' मला प्रतीत होतो आहे.

श्री. पाठक गुरुजींच्या वक्तृत्वाच्या शब्दतुषारांनी मी न्हाऊन निघालो आहे. त्यांचे भाषेवरील प्रभुत्व आणि अध्यापन कौशल्यआठवताच मन मोहरून जाते. विज्ञान आणि गणित विषय म्हणजे मॅट्रिकचे दादा; पण श्री. सहस्रबुद्धे दादांनी त्यातील कठिण्यच पार लुप्त करून टाकले. इंग्रजी तासाला श्री. भिडे व श्री. जोशी सर यांची गंभीर वाणी पुनश्च ऐकावयाला मिळत नाही म्हणून वाईट वाटते. इतरांना त्यांचे काय ? मला मात्र याच संस्कारात वळण मिळाले आहे; माझ्या व्यक्तिमत्वावर पैलू पडले आहेत.

ह्या साऱ्या अनुभवाच्या गोष्टी उद्या स्मृती बनतील. असीम–अनंताच्या कडांना स्पर्श करणाऱ्या महासागरात योगायोगाच्या झंझावातात नौका जवळ आणल्या जाव्यात—पण केवळ क्षणभरच. पुन्हा कधीही एकत्र न येण्यासाठी; त्यांना विलग केले जावे, तसेच झाले आहे आमचे. आता उरली आहे केवळ स्मृती.

याच हडस हायस्कूलमध्ये आयुष्यातील उत्साहाची व नव्हाळीची तीन वर्षे पाखराप्रमाणे भर्रकन उडून गेली. त्या हडस हायस्कूची स्मृती मी माझ्या मनात निरंतर जपून ठेवली. या गुरुजनांना मी कदापि विसरू शकणे अशक्य आहे. कारण तेच माझ्या जीवनाचे खरे खरे शिल्पकार होत. पण हडस हायस्कूलला माझी स्मृती राहील का ? प्रथम श्रेणीत प्रथम येणाऱ्या दिलीप मोदीची स्मृती राहील हे मात्र खरे. पण असंख्यांपैकी एक असणारा, कशातच न चमकलेला माझ्यासारख्या सर्वसामान्य मुलाच्या स्मृतीने हडस हायस्कूलने का भारावून जावे ?

कवि जगन्नाथाला गंगामय्याच्या पावन प्रवाहातील मासा व्हावेसे वाटले हे श्री. पाठक सरांचे शब्द आज मला खरे वाटतात कारण मलाही हडस हायस्कूलच्या परिसरातच वागडावेसे वाटते. माझ्या आशा अन् आकांक्षा अद्याप येथेच का बरे डुंबत आहेत ?

नरेन्द्र हेटे
माजी विद्यार्थी, नागपूर

Thank you very much for your letter, it was a nice surprise. It is nice to think that even after so many years, my school remembers me.

I find rather hard to put my thoughts down on the paper, especially, when I have just learnt to type, so please forgive my mistakes and rubbing outs.

Now to write about my feelings for school. I have been always very proud of my school though I joined it rather late. And I think my decision to change to this school was the best decision I have ever made. I am not just saying

these things to please you but I mean every word of it. You see before joining this school, I was never aware of the existence of the world as such. I was never interested in politics as such, which would have been a great disadvantage. But I remember, I used to look forward to the 'preps' when our headmaster, Mr. Bhide, used to give us the gist of what is happening in the world.

Another thing that impressed me most at that time, was the freedom we used to have to express our ideas Especially, I remember Mrs. Kesker, who used to teach us Hindi and Sanskrit. In her class, we never used to feel tense. And I think that helps you a lot in clear thinking.

Last but not the least, your classes were a great help to us. I think we gathered more general knowledge in your classes than by any other means.

Life in London is fine I am sure it has changed quite a lot since you saw it last. Where were you staying ? I like London very much for its variety of interests. Of course it is hard work if you are a housewife. We have a nice flat here and I have bought quite a few gadgets to make work easy.

Since May, I have started working part-time. You won't believe me if I told you that I teach mentally handicapped childern, you know the autistics type. I haven't taken any special training as yet but practical work is giving me enough training. I teach in the mornings and come home for lunch as my husband comes home for lunch. Then usual household chores and then my typing classes. I am thinking of doing some languages from next term.

Nothing more for pen. How are Arun and Chitra ? How's the school getting on ? Have you built any more stories ? Last I saw was the third storey was being built.

Please convey my regards to the staff.

London,
22nd Sept. 1967

Yours faithfully,
Shobha Gokhale

'ती माझी शाळा'

माझी शाळा ! सहावीपासून मी हडसमध्ये आले आणि इमारत पाहूनच शाळेच्या प्रेमात पडले.



एखादी वास्तु आपल्याला उगीचच आवडून जाते, तिच्या कणाकणाशी आपलं नातं आहे असं वाटत रहातं. माझं असंच झालं. आजसुद्धा माझी शाळा म्हटलं की प्रथम मला आठवण होते ती शाळेत प्रवेश केल्याबरोबर लागलीच दिसणाऱ्या जाळीदार भितीची किंवा हॉलवरती असणाऱ्या लाल टिनच्या छपराची किंवा निळ्याशार पाण्याने तुडुंब भरलेल्या स्विमिंग पूलची !

मग डोळ्यासमोर येताना भिडे सर आणि पी. आर. जोशी यांच्या प्रसन्न मूर्ती. (हीही एक गमतीदार प्रथा आहे. भिडे सरांना भिडे 'सर' म्हणायचं. मात्र पी. आर. जोशींना ना प्रिन्सिपल म्हणायचं ना जोशीसर. ते आपले 'पी. आर. जोशीच 'च) त्यांनी हसतखेळत प्रसंगी रागावून पण कसं योग्य वळण लावलं हे आठवून अगदी भरून येतं. शाळा सोडून आता दोन वर्ष झाली पण अजूनही त्या रस्त्यावरून जाताना इमारत दिसली की मी दचकून घडघाळाकडे पहाते. आठवड्यातून चार दिवस तरी मी प्रार्थना सुरू झाल्यानंतर शाळेत पोचायची आणि मग धडधडत्या अंतःकरणाने भिडेसरांचं रागावणं आणि क्वचित् एखादी हळू मारलेली छडी यांची

वाट बघत असायची! आता कॉलेजात जिवाचा आटापिटा करून का होईना, पण प्रेझेंटीच्या वेळेला मी वर्गात हजर असते याचं सर्व श्रेय भिडेसरांनाच द्यायला हवं. एवढीशी जरी काही चांगली गोष्ट केली तरी तिचं कौतुक केल्याशिवाय पी. आर. जोशी रहायचे नाहीत. मग ती वर्गात पहिला नंबर मिळवण्यापासून ते आंतरशालेय वक्तृत्वस्पर्धा जिंकण्यापर्यंत काहीही असो. त्यांच्या प्रेमळ उत्तेजनामुळे दुप्पट जोर चढायचा हे मात्र खरं. खरोखर या दोघांनी इतक्या हळुवारपणे मार्गदर्शन केलं की स्वतःशी व दुसऱ्याशी प्रामाणिक असणं, खरं बोलणं, व्यवस्थित असणं, स्वाभिमानाने वागणं, वक्तशीर असणं हे सर्व केव्हा आणि कसं अंगवळणी पडलं हे समजलंसुद्धा नाही. (हा जो शेवटचा गुण वक्तशीरपणा त्यावर आईबडील एकदम खूप आणि शाळेच्या कार्यक्रमांना यायला उत्सुक कारण बरोबर ठरल्यावेळी सगळे सुरू व्हायचे. मग त्यांनी केलेली शाळेची स्तुती ऐकून धन्य धन्य व्हायचं.) त्यांच्या हाताखालून गेलेला हडस हायस्कूलमधून बाहेर पडलेला विद्यार्थी त्यामुळेच कुठेही ओळखता येतो आणि त्याच्याबद्दल तावडतोब आत्मीयता वाटते.

या शाळेतील वातावरणच असं आहे की इथे वावरायला लागल्यावर परकेपणाची, दूरत्वाची कल्पनाच मनाला शिवत नाही. ही 'आपली' शाळा; इथले शिक्षक 'आपले', ते जरी रागावले तरी त्यांना आपल्याबद्दल खरी कळकळ वाटते, हे सर्व शब्द विनाच उमजून येते.

ही अशी शाळेविषयी आपुलकी होती म्हणून शाळा सोडताना फार जड गेले. आपलं शालेय जीवन संपलं, अवखळपणा हूडपणा करण्याचे दिवससुद्धा संपले हे जाणवून प्रचंड वाईट वाटत होतं. आणि ते खरंच होतं. पाठकसरांच्या तासाला आवाज टिपेला नेऊन रामः रामौ रामाः घोकण्याचे, लॅबमधे प्रयोगाच्या कागदावर चित्र काढत वसण्याचे, शनिवारी सक्काळी काकडत काकडत ड्रिल करण्याचे आणि सर्वात म्हणजे युनिफॉर्म घालण्याचे दिवस खरोखरच कायमचे संपले. पी. आर. जोशींनी केलेलं कौतुक, भिडेसरांची माया, मुळे सरांचं वात्सल्य आता नुसतं आठवणीत अनुभवायचं.

पण नाही. असं तरी मी कसं म्हणू? परवाच मी माझ्या एका मैत्रिणीला घेऊन शाळेत गेले होते. शाळेत पाऊल टाकताच वाटलं, छेः कुठेही काहीही एवढासुद्धा बदल झालेला नाही. तीच ती शाळा, तीच ती मी आणि तोच तो जिव्हाळा. माझी मैत्रिण देखील भारावली आणि हुरहुरत्या स्वरात म्हणाली 'ए काय ग्रँड आहे ग तुझी शाळा' मला अगदी तुझा हेवा वाटतो वघ!' मी अभिमानाने फुलले खरोखर इथं ह्या शाळेत शिक्षण ही किती भाग्याची गोष्ट होती आणि या शाळेने आपल्याला किती दिलं याची पूर्ण जाणीव मला झाली. मनात आलं हे लागेवांधे मी कितीही मोठी झाले, कुठेही गेले तरी तुटणार नाहीत. किती झालं तरी रेशमाच्या गाठी या!

इला पारसनीस
द्वितीय वर्ष, बी. ए.

कृतज्ञता



मी नवव्या वर्गात प्रवेश केला व त्याचवर्षी योगायोगाने आमच्या शाळेत जीवशास्त्र (Biology) हा विषय सुरू झाला. माझ्या मनाने हाच विषय घेण्याचा ठाम निश्चय केला. प्रथम त्या विषयाबद्दल आम्हाला कुतूहल व जिज्ञासा निर्माण झाली व पुढे त्याची जागा आश्चर्याने घेतली. व जेव्हा त्या विषयाबद्दल ज्ञान प्राप्त झाले तेव्हा आम्ही निसर्गाच्या लीलेकडे पहातच राहिलो.

आम्हाला त्या विषयात इतकी गोडी निर्माण झाली की कोणतेही फूल किंवा किडे, प्राणी ह्यांकडे पाहण्याचा आमचा संपूर्ण दृष्टिकोनच बदलला व पूर्वीप्रमाणेच आम्ही त्यांचे बाह्यरूप न पाहता त्यांकडे अंतर्गत (शास्त्रीय) दृष्टचा पाहू लागलो. आमच्यात ही

गोडी निर्माण करण्याचे श्रेय आमच्या शिक्षिका सौ. पांडे ह्यांनाच आहे. कारण आम्हाला शिकवताना त्या इतक्या कळकळीने, जिव्हाळ्याने, एकात्मतेने व विषयाशी एकरूप होऊन शिकवत की आमच्या स्मृतिपटलावर ते ठसून राही.

सर्वात अभिमानाची गोष्ट म्हणजे त्या वर्षीच हा विषय नवीन निघून सुद्धा आमच्या शाळेला प्रथम परितोषिक मिळाले व ते पुढे सतत चार वर्षे कायम राहिले. ही गोष्ट गौरवास्पदच नाही का ? ह्याचे सुद्धा सर्व श्रेय आमच्या शिक्षिका सौ. पांडेबाई ह्यांनाच दिले पाहिजे. कारण त्यांच्याच अनंत कष्टांचे हे फळ होय.

त्यांच्या ह्या शिकवण्याचा उपयोग आम्हाला आमच्या महाविद्यालयीन शिक्षणात फारच झाला.

जरी आम्ही सध्या महाविद्यालयांत शिकत असलो तरी शाळेत जी एक प्रकारची आपुलकी किंवा जिव्हाळा वाटतो तो तेथे दिसत नाही, व पदोपदी शाळेची आठवण येते व सहजगत्या तोंडातून शब्द बाहेर पडतात, "अहा ते सुंदर दिन हरपले."

कु. निषा का. सप्रे
एम. एस.सी. बायोकेमिस्ट्री, एल. आय. टी.

It gives me great pleasure to note that you have decided to honour the late Shri Hadas, the founder of the School, on the occasion of the Silver Jubilee Celebration. The late Shri Hadas was a dedicated educationist and strict disciplinarian. As a student, I had the privilege to be associated with him during my entire school career from 1942 to 1949 and I cannot forget the personal interest with which he brought me up. It was, indeed, unfortunate that we should have lost a man of his integrity and purpose at an immature age when we needed him most.

I am enclosing a cheque for Rr. 25/- as a token of my feelings for the joint effort you have undertaken and wis you every success.

October 3rd, 1967. **M. N. Shevrey,**
Staff Officer, State Bank of Indi
Ahmedabad-1

गतस्मृति

उत्तर अंबाझरीचा भव्य आणि गजबजलेला रस्ता
मोठमोठ्या शिक्षणसंस्थांचे ह्या टोकांपासून
त्या टोकापर्यंत वास्तव्य.
विद्यादानाने पावन झालेला हा पथ.
हे तर खरेच !
परंतु आणखी एक त्याचे आगळे वैशिष्ट्य.
ते म्हणजे आमचे हो आमचेच
हडस हायस्कुल.
रस्त्याच्या एका बाजुने ॲग्रीकल्चर कॉलेजचा
हिरवागार परिसर
दुसऱ्या बाजूस एक भव्य, रम्य इमारत
त्या रस्त्याने मी नेहमी जाते
आणि नेहमीच नकळत माझ्या तोंडून
उद्‌गार निघतात,
"हीच माझी शाळा"
मान ताठ होते, अभिमानाने उंचावते
आपल्या शाळेचे प्रगत स्वरूप पाहिल्यावर.
भिडे सरांची ती धीर गंभीर, शिस्तप्रिय
परंतु प्रेमळ मूर्ति
प्रिन्सिपॉल साहेबांचे स्मित चेहऱ्याने,
प्रसंगी करड्या आवाजातील हसत खेळत शिकवणे
तो स्विमिंग टॅंक.....
सतत मुलांच्या आनंदाने व हास्यकल्लोळाने—
उधाण आलेला—
सारे एक क्षणभर डोळ्यापुढून एखाद्या
चित्रपटासारखे सरकू लागते
मन प्रसन्न होते--अन् मी
आगळ्या उत्साहात मार्ग आक्रमू लागते
गतस्मृतींना उजाळा देत.

कु. विजया दशपुत्रे
रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया

Thank you very much for your letter which I received last week. It is a great pleasure for all of us that our school is celebrating its Silver Jubilee this year. Indeed time flies. I am not sure whether I will be able to send the article to our Magazine, never the less, I will try my best to do so.

How I wish I could have participated in the Celebrations.

Washington, D. C. Yours sincerely,
25th Sept. 1967 **Hema Devare**



Dear Joshi Sir,

I know this is an odd way of beginning a letter; even so I do it because this is how we affectionately called you, and would continue to do all our life.

I was happy to know that our school would be celebrating its Silver Jubilee in this month. I share the pride of hundreds of its students who are previleged to have been associated with a school that has had such an eventful life.

I owe a great deal personally to you and your equally worthy Collegues in moulding my thoughts and career. As a small expression of my gratitude, kindly accept the small sum I am sending along with my photograph.

Presently I am studying for final B. Sc. at St. Xavier's College, Bombay, with microbiology as the principle subject. My Divali vacation begins from the second week of this month and I am looking forward to attending the School's Silver Jubilee Function.

Oct. 1, 1967 **Padmaja Pandharipande**

Thank you very much for your surprise letter. Really your letter delighted me a lot. The whole day I was lost in the memories of my school days. Faces of all loving teachers snapped in front of my eyes and I realised the ties of affection which originate in my heart where I have preserved the idols of my great principal & respected teachers.

Though I had very short acquaintance with my school, I can argue with any one to prove that my school is the best school, like the 'Village School Master' — the poem you taught me.

The atmosphere in our school was very jolly. We all boys felt it to be in a family. The teachers like parent swere very loving to us but strict in case of studies.

While in school we all boys used to gather in our patent white shirt & navy blue pant, in the morning for prayer that created a feeling of equality and brotherhood. At the same time so many marvellouis songs filled with the pride for our Nation were taught to us. And whenever I listen or sing those songs I remember my school.

And the swimming pool.... ! I don't remember a day when we ourselves came out of the swimming pool without a rebuke from the peon or the teacher. I doubt I could have got this facility in any other school.

I remember the essay — I forgot the name — but it was something about 'Rainy day' or so. Bhide Sir called out my name and he began to read my essay. I was looking around with proud for the nice essay I wrote but....when Sir told that I had written 'meat' instead of 'meet' in the essay what a fun ! Whole class was laughing at the meaning and I also, though ashamed of my silly mistake, could not controll myself from laughter.

Sir, it is because of your kind help & the efforts I could achieve something in the S. S. C. exam. My success is undoubtably shared by you and all the teachers for the best guidance for which I am thirsty now.

At present I am studying in the pre–final year of College of Engg Poona. Till this year I have been given the National Scholarship for the success I got in S. S. C. exam. and 1st class in college annual exams.

I will be very pleased if you let me know the way and manner in which I can donate for the 'Silver jubilee Section' of our school building or for the Scholarship in memory of late Shri Bapusahib Hadas, as a token of the gratitude towards my beloved school.

Herewith I am sending my photograph you have asked. And I will be very glad if you send me a copy of 'Silver–jubilee' number.

Please remember me to Shri. Bhide, Shri. Sahasrabuddhe, Shri. Gupte and others and convey them my humble regards.

Hoping to recieve a letter from you. With highest regards.

Engg. College, Poona, 6–5–67

Yours obidiently
Shashikumar Tapaswi

आमच्या यशाचे श्रेय सर्वस्वी शाळेतील अध्यापकांना आहे. त्यांनी वेळोवेळी केलेले योग्य व अचूक मार्गदर्शन आणि आमच्यासाठी घेतलेले परिश्रम यांचे चीज म्हणजेच आमचे यश.

शाळेत असताना शाळेतील शिस्त फार कडक वाटत असे. पण आता त्या शिस्तीचे व शिस्त अंगी बाणविणाऱ्या मेहनती अध्यापकांचे महत्त्व पटू लागले आहे.

शाळेतील शिक्षण व कॉलेजमधील शिक्षण यात तर जमीन–अस्मानाचे अंतर आहे. शाळेत शिक्षक विद्यार्थ्यांना कळले नाही तर दहादा शिकवीत असत. प्रत्येकास कळले का याची विचारपूस करत. पण कॉलेजमध्ये अध्यापक 'लेक्चर' देऊन वर्गाच्या बाहेर पडले की त्यांचे काम संपले. विद्यार्थ्यांना कळले किंवा नाही याची ते दखल सुद्धा घेत नाहीत.

एकंदरीत काय शाळेतील शिक्षणात अध्यापकाचा फार हातभार असतो व तो आम्हाला फार मोठ्या प्रमाणात लाभला. म्हणूनच यश आमच्या हाती आले.

मुकुंद देसाई

Some Reminiscencs of my old School

1. Whenever I think of my school and I do it so often three personalities start materializing before me. My most valuable education was under their expert and loving care. Even today my inspiration and guidance comes from them. As far as I am concerned, Hadas High School will always mean Mr. N. S. Hadas, Mr. D. V. Bhide and Mr. G. T. Parande.

2. Mr. Parande, young, handsome, lover of sports and a great admirer of children, was our most favourite teacher. He loved us and we reciprocated tremendously. Mr. Parande took us out on many Saturdays for picnics and for swimming lessons. Swimming was a passion with him and it would be useless to count the number of students to whom be taught swimming. The picnics were so dear to us and we learned a lot about Nature.

3. When I joined our school in 1946, the school met in a building which does not exist any longer. 'Pacheriwala Ashram' stands in its

place now. The school was not very large, but we never noticed it. We had already studied the life of Booker T. Washington and that helped us to understand in our own way the problems which the school was facing. I now feel that it probably was not a coincidence that we were prescribed the biography of Booker T. Washington, Mr. Hadas' life, his trials, the school he built and even his death has such a strong resemblance to the life of that great Negro educator.



4. Here in Mr. Hadas' home, I came into close contact with late Mr. N. S. Hadas and Mr. D. V. Bhide. We all students were scared of Mr. Bhide because it was known that he demanded strict discipline. We were made to work very hard. It took us quite some time to realize that he loved us too. He was a very good teacher and knew exactly the key to academic success viz. hardwork. During college years I realized how much truth there was in what Mr. Bhide had tried to tell us. I was glad that I had a teacher who had taught me to work hard. Since then I have never found if difficult at all. As a matter of fact I enjoy it.

5. Mr. Hadas never taught me a course and yet hie influence on my life is pretty deep. His school reflected his personality. implicity, Ssincerity and truthfulness were the keynotes of his personality. Mr. Hadas had the great knack of understanding our personalities. Mr. Hadas had completely identified himself with his school and we loved the school as much as we loved him. Mr. Hadas was also a man of original ideas. He definitely was a keen student, lover and practitioner of the philosophy of life preached in Bhagwad Gita.

6. My school was made of persons like late Mr. Hadas, Mr. Parande and Mr. Bhide. We had not much sport equipment. We learned our subjects well, came to love Nature and what is most important, we most naturally learned the values of life. The school now has grown and has almost everything that a big school should have but can it boast of teachers like I had? Is it only teaching the subjects well or is it also teaching a way of Life? I would be very happy if the present generation of students will say "Yes" to my questions.

Sharad Amte
Phy. Dept., Vandesbilt University,
Nashville, Tenn. U. S. A.

आठवणी दाटतात

१९५८–५९ मधे कु. शामला घुगरे, कु. शैलजा केळकर, कु. शोभा गोखले व मी अशी आमची चौकडी या शाळेत १० वी मॅट्रिक करण्याच्या उद्देशाने दाखल झाली. माझा व्यक्तिशः मुलांच्या शाळेत शिकण्याचा उद्देश म्हणजे शिवणकाम, भरतकाम, विणकाम या अत्यंत नावडत्या विषयांपासून कायमची मुक्ती. तेव्हा मूलतः हे एकच समाधान आहे असे

वाटत असले तरी लवकरच आपण एका फार उत्कृष्ट शाळेत आलो आहोत हेही कळून चुकले.

केवळ एक वर्षाच्या अल्पस्वल्प काळात या शाळेने एक कायमची स्मृती कोरली. वैयक्तिकरित्या गुरुजनांशी अमोल सहवास लाभल्याने या शाळे-संबंधीच्या आठवणी अविस्मरणीय ठरल्या आहेत.

आमचा वर्ग म्हणजे १० अ. श्री. भिडे गुरुजी हे आम्हाला इंग्रजी व भूगोल शिकवीत. व्यक्तिश: ते आमचे आवडते होते (व आम्हीही त्यांच्या आवडत्या होतो असे वाटते.) त्यांची मर्जी संपादन करावी असे आम्हा प्रत्येकीलाच वाटे व त्यापायी आमच्या डोळ्यांना त्यांची 'पार्शालिटी'ही दिसत असे. (आता स्वानुभवाने ती पार्शालिटी म्हणजे गुण-ग्राहक व गुणी यांतील स्वाभाविक सौहार्द होते हे पटते.) व आम्ही एकमेकीमध्ये त्या वयाला स्वाभाविक असणाऱ्या चढाओढीने वागत असू.

भिडे सर नुसते शिकवून थांबत नसत. परीक्षेच्या दृष्टीने अभ्यास कसा करावा व केलेल्या अभ्यासाची योग्य मांडणी कशी करावी याचे उत्कृष्ट technique ते आम्हाला सांगत. Students' participation हे त्याच्या तासाचे एक आगळे वैशिष्ट्य होते.

भूगोल हा विषय आम्हाला नवा होता परंतु सरांच्या प्रोत्साहनामुळे त्या विषयाची भीती वाटेनाशी झाली. त्यांच्याबरोबर Atlas उघडून आम्ही जी विश्वभरारी मारत असू तिची आजच्या 'Around the world' ला काडीची सर नाही.

श्री. जोशीसाहेब यांचा आमच्यावर आठवड्यातून एकदाच तास असायचा. त्यात ते आम्हाला इंग्रजी शिकवीत. त्यावेळी इंग्रजी हा एक विषय न वाटता ती एक गोड भाषा आहे याची प्रचीती येई. इंग्रजी ही परकीय भाषा आम्ही मातृभाषेसारख्या सहजतेने वापरावी यासाठी त्यांची धडपड असे. परंतु आजही मला आठवण येत असेल तर त्यांनी शिकवलेल्या कै० सरोजिनी नायडूंच्या The Village girl या कवितेची. Full are my pitchers and far to carry.....असे भावपूर्ण शब्द हातवाऱ्यासकट ते म्हणत. पुस्तकातल्या निर्जीव ओळी 'अशा' सजीव शिकण्याची आमची ती पहिलीच वेळ होती. इंग्रजी कवितेचीं चिरफाड न करता रसपान करण्याची माझी ती पहिली सधी आहे.

जोशी सर आम्हाला Extra Curricular activities मधे भाग घेण्यासाठी खूप उत्तेजन देत आणि हे सर्व असूनही आम्हाला जोशी सरांची दोन गोष्टींसाठी धास्ती वाटे. एक म्हणजे कोणत्या वेळी ते सर्व मुलांसमोर उभे करून प्रार्थना किंवा राष्ट्रगीत 'गायला' लावतील याचा नियम नसे व त्याचप्रमाणे कोणत्या वेळी आमच्या General knowledge ची चाचणी घेतील याचाही नियम नसे.

गुरुजनांपैकी अगदी जवळच्या वाटणाऱ्या म्हणजे सौ. केसकरबाई. त्यांचा अकृत्रिम स्नेह कोण विसरेल बरे ? केवळ त्यांच्याच उत्तेजनामुळे निदान मॅट्रिक पर्यंत तरी आपली पवित्र 'देववाणी' शिकण्याचे भाग्य आम्हाला लाभले.

श्री. सहस्रबुद्धे व श्री. सहस्रभोजनी ही सायन्स व गणित या दोन विषयाप्रमाणेच अतिशय Inte-esting अशी जोडगोळी होती.

सहस्रभोजनी सरांचा गणिताचा तास अगदी रंगात आला असे आणि इतक्यात ऑफिसमधून कोणत्याही विद्यार्थ्याच्या नावाची चिट्ठी घेऊन चपराशी येई व रंगाचा बेरंग करी. परंतु अशा वेळी "अहो आपल्याला 'मागणी' आलेली आहे." अशी विनोदी कोटी करून ते त्या विद्यार्थ्याची बोळवण करीत व वर्गातील वातावरण लगेच सावरून घेत.

श्री. सहस्त्रबुद्धे व श्री. सहस्त्रभोजनी यांच्या तासाला वर्गात इतके उत्साहाचे वातावरण असे व दर दोन मिनिटांनी अशी खसखस पिके की आपण फिजिक्स व गणितासारखे रूक्ष विषय शिकत आहोत याची जाणीवही नसे.

अशा कित्येक आठवणींची फुले मनाच्या फुलदाणीत अजून सुगंध पसरत आहेत. मग जी फुले नेहमी ताजीच असतात त्यांच्यावर आता हे स्मृतीचे पाणी शिपडून, त्यांना मुद्दाम फुलवण्याची काय गरज ? आणि जो काळ 'भूतकाळ' कधीच नव्हता त्याला स्मृती म्हणण्याची काय गरज ?

कु. प्रियंवदा यशवंत साठये
नागपूर

हडस विद्यालयातील माझ्या काही गोड आठवणी

अ. रा. परांजपे

गतकाळातील गोड गोष्टींच्या आठवणी झाल्या की त्या आपल्याला भारावून टाकतात. क्षणभर का होईनात पण आपणाला त्या गतकाळच्या वातावरणात नेतात, त्यामुळे मनाला थोडा वेळ शांतता मिळते व आनंदही होतो. सुंदर वस्तूंचे चित्रण, गोड गाण्याची गुणगुण, आपल्या आवडत्या–नावडत्या व्यक्तींची स्वभावचित्रे, आपले आवडते छंद, अशा एक ना दोन, किती तरी आठवणींचा समूह त्यात असतो. काही आठवणी गोड तर काही कटु असतात. त्याच आपल्या मनाला विरंगुळा देतात. हे जगच सुष्ट व दुष्ट गोष्टींनी भरलेलं आहे. मग आठवणी तरी तशा का नसाव्यात ?

हडस विद्यालयातील माझ्या पाच वर्षांच्या काळातील काही आठवणींचा निर्देश करण्याची संधी शाळेच्या रजत-महोत्सवाच्या निमित्ताने मिळाल्यामुळे मला फार आनंद होतो.

हडस हायस्कूलच्या पूर्वेतिहासाची मला फारशी माहिती नाही. इ. स. १९५२ मध्ये आमच्या अप्पासाहेबांनी म्हणजेच सध्याचे शाळेचे प्रिन्सिपॉल श्री. पी. आर. जोशी यांनी हडस हायस्कूलची सूत्रे स्वतःच्या हाती घेतली त्यावर मी एकदा हडस हायस्कूलची जुनी झोपडीवजा इमारत पाहिली होती. पण पुढच्या पाच-सात वर्षांत, अप्पासाहेबांच्या धडाडीच्या कर्तृत्वाने त्या झोपडीचे भव्य व सुंदर इमारतीत रूपांतर झाल्याची मला कल्पना नव्हती. इ. स. १९५९ च्या जुलै महिन्यात मी त्या शाळेत शिक्षक म्हणून आलो तो ह्या नवीन इमारतीतच ? त्यावेळी शाळेची प्रशस्त जागा, स्विमिंग पूल, खरे हॉल व शाळेच्या इमारतीचा पहिला मजला तयार झाला होता. त्या सर्व गोष्टी पाहून मी थक्कच झालो ? माझ्या स्मृतिपटावरील ती जुनी शाळा माझ्याशी जणू मूकवृत्तीने बोलत आहे असा मला भास झाला. "पाहा ? पाहा ? माझ्याकडे निरखून पाहा. मी किती गोंडस-गुटगुटीत व रेखीव झाले आहे ? अप्पासाहेबांनी मला बालामृत पाजलं व त्यांच्या सहकारी शिक्षकांनी माझी शुश्रूषा केली. संगोपन केलं. आता माझी वाढ उफाड्याची होईल असं मला पाहणारे लोक म्हणतात. मला बालामृत मिळालं नसतं तर ? तर काय...? पण जाऊं दे तो अमंगल विचार ?" मी स्तिमितच झालो ?

खरंच ! अवजड कर्जाचा बोजा, तट्ट्याच्या भिंतीची झोपडीवजा इमारत, शे-सव्वाशेपर्यंत विद्यार्थ्यांची संख्या ? शाळेची प्रगति करावयाची कशी, तिला ऊर्जितावस्था आणावयाची कशी ? ह्या प्रश्नांनी सामान्य मनुष्य दिङ्मूढ झाला असता. पण अशा वेळी अप्पासाहेबांसारखा महान् कर्तृत्ववान् पुरुष शाळेला मिळाला. श्री. अप्पासाहेब सुविध व शिक्षणक्षेत्रात तरबेज आहेत. ते अत्यंत व्यवहारी व साक्षेपी आहेत. बहुश्रुत व चतुरस्र आहेत. गोड वाणी व प्रसंगावधान ह्या गुणांमुळे प्राप्त परिस्थितीला धैर्याने तोंड द्यावयाचे हा त्यांचा बाणा आहे. "विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः । प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति" ही त्यांची जिद्द आहे. उंचावरून पडलेला चेंडू जसा पुन्हा जोराने वर उसळी घेतो त्याप्रमाणेच अपयश आले तरी ते पुन्हा प्रयत्न करून अंगीकृत कार्यांत यशस्वी होतात. मिळतील त्या साधनांचा योग्य तऱ्हेने उपयोग करून आपली कार्यसिद्धि करण्यात त्यांचा हातखंडा आहे. म्हणूनच सर्व अडचणींचा परिहार करून इतक्या त्वरित शाळेच्या नवीन इमारतीचा पहिला मजला तयार करणं त्यांना शक्य झालं. ही नवीन इमारत पाहून

मला भोजप्रबंधातील समस्यापूर्तीच्या श्लोकचतुष्टयाची आठवण झाली :—

एक वृद्ध ब्राह्मण आपली पत्नी-पुत्र व स्नुषा यांसह भोजराजाच्या दरबारी गेला. भोजराजाने त्या चौघांना समस्यापूर्तीसाठी श्लोकाचा शेवटचा चरण दिला. प्रत्येकाने निरनिराळा श्लोक रचून समस्यापूर्ती केली. त्यात त्या पुत्राने केलेल्या समस्येची मला आठवण झाली:— " विजेतव्या लङ्का.....क्रिया-सिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे. "

" श्रीरामचंद्रांना लङ्का जिंकावयाची होती, समुद्र पायीच ओलांडावयाचा होता, रावणासारखा शत्रु समोर होता व रणांगणावर फक्त वानरांची मदत होती. तरीपण रामचंद्रांनी सर्व दुष्ट राक्षसकुलाचे निर्दालन करून लङ्का जिंकली. लहान् व्यक्तींची कार्यपूर्ती त्यांच्या हिमतीवर—सत्त्वगुणावर अवलंबून असते. साधनावर नाही. "

त्या शाळेत येताच मला प्रथम जर कोणती गोष्ट खटकली असेल तर ती म्हणजे त्या शाळेतील कडक शिस्त ? शिस्तीनेच सर्व कार्ये व्यवस्थित होतात हे अगदी सत्य आहे. पण इतकी धारदार शिस्त प्रत्येक बारीकसारीक गोष्टीत देखील लावलीच पाहिजे असे नाही. अप्पासाहेबांना विद्यार्थीदशेत आमच्या घरी कडक शिस्तीतूनच जावे लागले म्हणूनच ते इतके मोठे-महान् झाले; पण ती शिस्त इतकी धारदार नव्हती. मी १।२ महिन्यांतच ह्या शिस्तीशी समरस झालो. पुढे ही शिस्तीची धारजरा कमी झाली. कोणत्याही संस्थेची प्रगती शिस्तीमुळेच होते. म्हणूनच ' शिस्त हीच त्या शाळेच्या प्रगतीची गुरुकिल्ली आहे ' हे माझ्या लक्षात आले.

इ. स. १९६० च्या S. S. C. परीक्षेत काही विद्यार्थी-विद्यार्थिनी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या. १९६०मध्ये शाळेचा दुसरा मजला तयार झाला. ह्याच वर्षी त्या शाळेत संस्कृत कॉंपोझिट, म्यूझिक व बायालॉंजी हे नवीन विषय सुरू झाले. विद्यार्थी-विद्यार्थिनींची संख्या ८०० पर्यंत गेली. गाणे (Music) हा शाळेचा सौभाग्याचा विषय असतो. श्री. खानवाल्यांसारखे गायनविशारद शिक्षक शाळेला मिळाल्यामुळे शाळेची फारच प्रसिद्धी झाली. गायन, पोहणे, नाट्य, खेळ इत्यादि गोष्टींची शाळेत भर पडली. १९६१ चा शाळेचा S. S. C. परीक्षेचा निकाल फारच समाधानकारक लागला. चार विद्यार्थी मेरिट-मध्ये पास झाले, काही प्रथमश्रेणीत, तर बरेच द्वितीय व तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. S. S. C परीक्षेतील यशाचा हाच क्रम उत्तरोत्तर वाढतच गेला. इ. स. १९६४ च्या एप्रिलअखेर मी ही शाळा सोडली ?

या शाळेत ज्यांना शिकायला व शिकवायला मिळते ते विद्यार्थी व शिक्षक-शिक्षिका दैववान् आहेत, धन्य आहेत असं माझं मत आहे. हुशार, विनयशील व उत्साही विद्यार्थी-विद्यार्थिनी ह्या शाळेत असतात. त्यांचा उत्साह पाहून माझ्यासारख्याला " वृद्धः अपि तरुणायते " असे होऊन जाते.

ह्या शाळेत सुविद्य, विनयशील व कामाठी आणि शिस्त पाळणारे शिक्षक—शिक्षिका असल्यामुळेच S. S. C. परीक्षेतील ह्या शाळेचे उत्तम प्रकारचे निकाल लागत असतात. अप्पासाहेब बाहेरचा व्याप सांभाळतात, श्री. भिडे साहेब शाळेतील अंतर्व्यवस्था पाहातात व सर्व शिक्षक—शिक्षिका त्यांना हार्दिक सहकार्य देतात म्हणूनच नागपुरातील उत्तम शाळांत ह्या शाळेची गणना होते. हे काम कोणाहि एकाच व्यक्तीकडून होत नाही. हे सांघिक काम (Teamwork) आहे. श्री. भिडे साहेब अधून-मधून शिक्षक—विद्यार्थ्यांना शिस्तीच्या रसाचे घुटके पाजत असतातच; पण ते सर्व शाळेच्या शिक्षक वर्गाच्या हितासाठीच करतात. ते बोलले तरी अंतः करणाचे फारच दयाळू आहेत असा माझा अनुभव आहे.

स्थलसंकोचास्तव मला विद्यार्थ्यांचा व सर्व शिक्षक—शिक्षिकांचा नामनिर्देश करता येत नाही. फक्त २।४ व्यक्तींचाच मी नामनिर्देश करतो. त्या व्यक्ती म्हणजे श्री. अप्पासाहेब, श्री. भिडे साहेब, श्री. वसंतराव पाठक व श्री. खानवाले. ह्या चारही व्यक्तींतील काही विशिष्ट गुणांमुळेच मी त्यांचा नामनिर्देश केला आहे. तरी त्यावद्दल शिक्षक बंधु—भगिनी गैरसमज करून घेणार नाहीत.

शाळेची उत्तरोत्तर प्रगती होत जाईल असा माझा शुभाशीर्वाद आहे.

———

हडस विद्यालयाचे श्रेय व प्रेय

वसंत गणेश पाठक

श्रेय

'तुम्ही दररोज अशाच रीतीने शाळेत उशीर करणार का ? तुमचा हा पहिलाच दिवस भावी जीवनाची कल्पना देणारा दिसतो' मुख्याध्यापक श्री. भिडे यांचे ते आज्ञोक्त शब्द होते.

'नाही सर ! मला क्षमा करा. काही अगतिक कामामुळेच मी उशिरा येत आहे' मी नम्रपणे उत्तर दिले; पण मनात मात्र मी खजिल झालो–मनाचा ससा गोंधळला होता; चक्क शब्दात खोटे बोलावे व वेळ निभवून न्यावी असे मला वाटू लागले.

'कामे तुम्हालाच असतात तशी मलाही असतात. शिक्षकांनी निश्चित वेळेवर यावे हा शाळेचा नियम आहे. तुमचा हा पहिला दिवस आहे म्हणून सूचित करतो.'

'यापुढे आपल्याला असे बोलण्याचा प्रसंग येणार नाही सर !' असे म्हणून मी शिक्षकांच्या खोलीत गेलो.

साडे दहा वाजता शाळा सुरू होते, मला दहा वाजून वत्तीस मिनिटे झाली होती. नोकरीचा तो पहिलाच दिवस होता. प्रथमग्रासे भक्षिकापात झाल्याप्रमाणे मी खिन्न झालो—मनात विचारांचा गोंधळ सुरू झाला—चूक आपली––याच विचारात असता रामचंद्राने वर्ग १० वर जाण्याची सूचना मला दिली.

वर्गात जातानाही मी विचारातच होतो.–आपलेच चुकले विद्यार्थी जर उशिराने आला तर आपल्याला चालेल का ? नाही मग मुख्याध्यापक भिडे आपल्यावर रागावलेत ते योग्यच ना ! 'हितं मनोहारि च दुर्लभं वचः' हे सुभाषित आठवले. घरी आई वा वडील मुलाची चूक आढळताच रागावतात. मग आपण त्यांच्यवर रागावतो का ? असल्याच काहीशा विचारात चार तास संपले.

मधल्या सुटीत 'साहेब बोलावतात सर !' रामचंद्राने येऊन सांगितले.

आणखी काय ऐकावयाला मिळणार या संभ्रमित विचारांनीच मी भिडे साहेबांचे समोर उभा राहिलो.

'या –वसा.' मुख्याध्यापक श्री. भिडे म्हणाले. मी मात्र उभाच होतो.

'अहो–वसाना.' पुनश्च त्यांनी मजकडे पाहून म्हटले. आता मात्र मी त्यांच्यासमोरील खुर्चीवर वसलो, ते बोलू लागले.

'पहिल्या तासापूर्वी मी तुम्हाला जे बोललो त्याचा तुम्हाला राग आला का ? थोडा विचार करा; तुम्हाला माझे शब्द बोचले असतील पण काही दिवसांनी तुम्हाला ते पटतील; आणि तुमचा आवाज आहे खणखणीत पण जरा सावकाश अन् हळू बोला; आज तुम्ही तरुण आहात त्यामुळे निभवून न्याल; पण ही सवय मात्र पुढे तुम्हाला शीण आणील. हळू आवाजात जर तुम्ही शिकविले तर अधिक बरे" अत्यंत प्रेमळपणाने मला ते समजावून सांगत होते. स्मितहास्याने मी त्यांच्या भाषणाचें स्वागत केले.

'प्रयत्न करीन सर !' मी म्हणालो; घरी जाताना मात्र श्री. भिडे सरांविषयीच्या माझ्या विचारात बदल झालेला मलाच दिसू लागला. चूक दिसताच स्पष्टपणे कानउघाडणी करणारे भिडे गुरुजीकाही वेळाने आपल्या स्नेहमय हृदयाचे आविष्करणही करतातच.

'भिडे गुरुजी म्हणजे शिस्त' असे समीकरण मी मनात तयार केले. कोणतीही सभा असो वा वर्ग असो—निश्चित वेळेनुसार सुरू—प्रारंभ झालाच

पाहिजे, असा त्यांचा काटेकोर स्वभाव. शिक्षकाला शिस्त अत्यंत आवश्यक आहे. त्याचेच अनुकरण विद्यार्थीवर्ग करणार, देशातील पिढी बेशिस्त झालेली चालेल का ? भिडे गुरुजींच्या जीवनरथाचे सारथ्य शिस्त करीत आहे. त्यांचे शब्द प्रारंभी बोचक वाटतात पण अंतिम मात्र ते रोचक ठरतात हा माझा अनुभव आहे. पहिल्याच तासापूर्वी फाडफाड शब्दांचे फटकारे मारणारे फटकळ भिडे गुरुजी काहीच क्षणांनंतर प्रेमभराने विद्यार्थ्याला वा शिक्षकाला जवळ घेऊन समजावूनही सांगतात. 'वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि' या उक्तीचा प्रत्यय मला त्यांच्या स्वभावात आढळतो. नारळाचे बाहेरचे कवच रूक्ष अन् टणक असते पण आत अमृतोपम, मधुर अन् सुरस शहाळे तृषितांची तृषा शमविते. नारिंगाची टरफले सोलताना डोळ्यात अश्रू येतात पण आतील फोडींचा आस्वाद घेताना खाणारा अंती संतुष्ट होतोच. तसाच प्रत्यय भिडे गुरुजींच्या संबंधात प्रत्येकाला येतो.



श्री. द. वि. भिडे

शिक्षणाविषयी अनन्य निष्ठा, विद्यार्थीवर्गावरील अकृत्रिम प्रेम आणि शाळेच्या सर्वांगीण उन्नतीची आंतरिक जिद्द इत्यादी अनेक पैलू श्री. भिडे गुरुजींच्या स्वभावात आढळतात. या सर्वांपेक्षा ते विद्यार्थीवर्गात प्रिय आहेत—स्वतःच्या अध्यापनचातुरीने. इंग्रजी विषय अत्यंत सुलभ पद्धतीने ते मुलांना उकलून दाखवितात. त्यांच्या वर्गात शिकणाऱ्या मुलाला इंग्रजीचे भय नसते. भिडे गुरुजींच्या भयापुढे विषयाचे भय मात्र पार दूर सरते. वर्गात गेल्यावर शिकविण्याला प्रारंभ झाला की तास केव्हा संपतो हेही विद्यार्थ्यांना कळत नाही; इतके ते व विद्यार्थी विषयाशी तद्रूप होतात.

कॉलेजमध्ये गेलेली अनेक मुले व मुली त्यांच्या इंग्रजी अध्यापनाची व शिस्तबद्ध जीवनाची आठवण सांगतात. अनेक माजी विद्यार्थ्यांनी रजतमहोत्सवाच्या निमित्ताने पाठविलेल्या पत्रांतून त्यांच्या ऋणाचा निर्देश केलेला आढळतो.


शाळेचा क्षण अन् क्षण ते वाया जाऊ देत नाहीत; म्हणूनच हडस विद्यालयाला कमीत कमी सुट्या असतात. दररोज प्रार्थनेच्या वेळीही विद्यार्थीवर्गाच्या चुका त्यांना स्पष्टपणे बजावतात. टाकीचे घाव घालणारा शिल्पकार घाव घालताना पत्थरांच्या भावनांचा विचार करीत असतो कां ? पण त्यातून निर्माण होणारे शिल्प जसे पत्थराला अमरपद देते तसेच शिल्पकाराला लाही अमरपदी बसवितेच. यातच हडस विद्यालयाच्या यशाचे श्रेय भरले आहे असे मला वाटते. भिडे गुरुजींच्या संवादी साथीनेच प्राचार्य अप्पासाहेब जोशी यशस्वितेचे शिखर अत्यल्प वेळात गाठू शकले.

श्री. भिडे यांच्या वयाला साठ वर्षे भरली आहेत. त्यांनी प्राणपणाने संगोपिलेला हा हडस विद्यालयाचा वृक्ष आज फुलला अन् फळला आहे. आपल्या फुलोरांनी तो दशदिशा सुरभित करीत आहे. यातच 'माझ्या जीवनाचे सार्थक झाले' असे उद्गार त्यांनी अनेक वेळी काढले आहेत. ज्ञानदानाच्या अखंड साधनेने ते जरी आत्मतृप्ती अनुभवीत असले तरी विद्यार्थी वर्ग मात्र अद्याप अतृप्तच आहे. विद्यालय चिंतनाविण दुजी कथा नावडणाऱ्या श्री. भिडे गुरुजी यांना परमेश्वराने दीर्घायुरारोग्य द्यावे हीच प्रार्थना.

———

प्रेय

जगात अनेक स्मारके आहेत व त्यांनी स्मारक-कर्त्यांना अमरपदावर चढविले—कर्त्यांचे यशही दशदिशांना पसरविले. हडस हायस्कूल हे सुद्धा श्रीमान आप्पासाहेब जोशी यांचे जिवंत स्मारक आहे. या भव्य वास्तूची वीट अन् वीट आप्पासाहेबांच्या नावाने जयघोष गात आहे. दरवर्षी शेकडो विद्यार्थी या विद्यालयातून बाहेर पडतात व 'ज्ञानदाता सुखी भव' अशा सदिच्छा व्यक्त करतात. या वास्तूच्या पायभरणीपासून तो कळसापर्यंतचे सारे कार्य श्रीमान आप्पासाहेबांचे मूल्यमापन करणारे आहे. जोपर्यंत ही भव्य वास्तू उत्तर अंबाझरी मार्गावर ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत आहे तोपर्यंत श्री. आप्पासाहेबांचे विमल यशच उभे आहे असे म्हटल्या जाणार.



श्री. पु. रा. जोशी


स्वर्गीय बापूसाहेब हडसांच्या मृत्यूनंतर कर्जाचा भव्य डोंगर विद्यालयाच्या माथ्यावर असताना या विद्यालयाची सूत्रे श्री. आप्पासाहेबांनी हाती घेतली. या वेळी त्यांच्या मित्रांनी हडस विद्यालयाला 'बुडणारे कुजके तारू' ही उपमाही दिली होती पण मातेने दिलेला कौलच मनात मानून हडस विद्यालयाला आपल्या समर्थ बाहूंचा आश्रय आप्पासाहेबांनी दिला. सर्वस्वनाशाचा क्षण जवळ आला असताही या नौकेला सुखरूपपणे परतीरावर नेण्याचे महनीय कार्य याच कर्णधाराने पार पाडले. कर्जाचा झंझावाती वारा हडस विद्यालयाची प्राणज्योत मालवू बघत असता श्रीमान आप्पासाहेबांनी त्याला संजीवन दिले; स्वकीय जीवनदानाने ती ज्योत विझू न देता प्रज्वलित केली आणि आज तर तिच्या झगझगित तेजाने विरोधकही स्तिमित झालेले आहेत. आप्पासाहेबांच्या यशस्वी जीवनाचे हेच मूल्यमापन होय. कर्जाचा अमाप डोंगर पादाक्रांत करून ज्ञानदानाचे पवित्र कार्य अखंडपणे चालविणारी ही भव्य वास्तूच त्यांच्या यशाचे मूर्तिमंत प्रतीक होय.

'दरिद्राणां मनोरथाः निष्फलाः' निर्धनी लोकांचे मनोरथ निष्फल असतात. पण आप्पासाहेबांनी दारिद्र्याचाच उपहास करून आपले जीवन घडविले आहे. पित्याच्या अकाली मृत्यूनंतर आकाशीची कुऱ्हाड माथ्यावर कोसळली असताही परमेश्वराला 'जगन्नायका! कुऱ्हाडीचे घाव तू माथ्यावर मार पण ते सोसण्याचे सामर्थ्य अंगी देई' ही मागणीही मागितली. विधवा आईबरोबर शेतावर काम करणारा; पहाटे चार वाजता उठून मातेबरोबर ज्वारी दळणारा; दोन-तीन मैलांवरून डोक्यावरून पाणी आणणारा व वार लावून स्वतःचे शिक्षण करणारा हा पुरुषोत्तम अखेरीला नियतीच्या परीक्षेला उतरला. परमेश्वरावर अनन्य श्रद्धा आणि मातेवरील अढळ निष्ठाभाव यामुळेच या पुरुषोत्तमाने दारिद्र्याला धिःकृत केले. दारिद्र्य हे शिक्षणाच्या आड येऊ शकत नाही हे स्वतःच्या यशाने दाखविले. बालपुरुषोत्तमाच्या जीवनरथाचे सारथ्य माता व मामा करीत होते. श्री. अनंतराव परांजपे यांनी शिस्त, स्वावलंबन, सहानुभूति, सेवाभाव व साधी राहणी इत्यादी गुणांचे बाळकडूच पाजले. 'माझ्या जीवनाचा शिल्पकार माझे मामा होत' असे उद्गार प्रस्तुत लेखकाजवळ अत्यंत अभिमानाने व साश्रुनयनांनी आप्पासाहेबांनी काढलेत. आणि म्हणूनच अनेकदा मामांच्या सुसंवादी सुसंस्कारांनी साकारलेले पुरुषोत्त-

माचे व्यक्तिमत्व अशक्य ते शक्य करू शकले. नियतीच्या दैविक वरानेच या समर्थ पुरुषोत्तमाने यशःसिद्धि करतलामलकवत् करून दाखविली. सत्ता, संपत्ती आणि सरस्वती या देवतात्रयींनी त्याच्या मस्तकावर वरदहस्त ठेवल्यानंतर उणे काय पडणार ? इंग्लंडसारख्या देशात जाऊन व आपल्या बुद्धीची छाप पाडून स्वकीयांबरोबर परकीयांनाही त्याने चकित केले. लठ्ठ पगाराची नोकरी चालत आली असताही समाजसेवा हेच व्रत मनात ठरविले. याच वेळी हडसांच्या मृत्यूने सामाजिक व शैक्षणिक कार्य करणारी ही संस्था पोरकी झाली होती. आईच्या वरदहस्ताने या पुरुषोत्तमाने हडस विद्यालयाच्या धुरेला आपली प्रतिभा जुंपली. थोडक्याच अवधीत जे मनोरथात होते त्याला मूर्तरूप येऊ लागले.

हडस विद्यालयाकरिता भिक्षापात्र घेऊन आलेल्या या समर्थ पुरुषोत्तमाच्या वाटचाला धनाबरोबर यश सुद्धा आले. एक तपाचे आत दोन लाखांची विद्यालयाची स्वतःची इमारत त्यांनी निर्माण करून दाखविली. समाजसेवेच्या आणि विद्यादानाच्या पवित्र कार्याला तनमनधन अर्पण करून नवीन विक्रम प्रस्थापित केला. भारतीय शासनाने राष्ट्रीय पुरस्कार देऊन त्यांच्या समाजसेवेच्या कार्याची पावती त्यांना फाडून दिली. विदर्भातही राष्ट्रीय पुरस्कार मिळविणारे श्रीमान आप्पासाहेब हे पहिले ठरावेत हा योगायोगच म्हणावा. पण या सर्व यशाचे श्रेय आपल्याकडे न घेता 'तत्सद् ब्रह्मार्पणमस्तु' वृत्तीने जनता जनार्दनालाच अर्पण केले. 'ज्या समाजाने मला संगोपिले त्याच्या ऋणातून मुक्त होण्याचा हा माझा अल्पसा प्रयत्न आहे.' असे उद्‌गार त्यांनी स्वागतप्रसंगी काढलेत.

श्री. आप्पासाहेबांचा विद्यार्थीवर्गावर अत्यंत लोभ असतो. प्रत्येक विद्यार्थी त्यांच्यावर अकृत्रिम प्रेम करीत असतो. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीकरिता ते अहोरात्र झटत असतात; विद्यार्थीवर्गाकरिताच नवनवीन योजना त्यांनी कार्यान्वित केल्यात. मला माझ्या विद्यार्थ्यांचे प्रेम हवे असे ते नेहमी म्हणतात. हडस विद्यालयातील स्विमिंग पूल, खरे हॉल, गायनवर्ग, चित्रकलामंदिर, विज्ञानमंदिर इत्यादी अनेक योजना हाती घेऊन त्यांनी यशस्वी करून दाखविल्यात. म्हणूनच आप्पासाहेब विद्यार्थीवर्गाचे अनन्य श्रद्धास्थान होऊ शकले—विद्यार्थीवर्गाचे ते प्रेयरूप बनले आहेत.



राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् यांच्या हस्ते राष्ट्रीय पुरस्कार स्वीकारताना श्री. जोशी

आमच्या मुलांची शाळा

प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे

शिक्षण म्हणजे संस्कार !

शाळेत काय किंवा कॉलेजात काय, वर्गात जे ज्ञान मिळतं ते म्हणजे ज्ञानाची नुसती चुणुक ! एक प्रकारची झलक ! उत्तमातला उत्तम विद्यार्थी सुद्धा प्रत्यक्ष पुस्तकांचा अभ्यास करतो तो ठराविक अभ्यासक्रमाच्या अन् परीक्षापद्धतीच्या चौकटीत ! शिक्षकांचं अध्यापनही साहजिकच त्या चौकटीत अन् त्या दृष्टिकोनातून !

पण शिक्षणाचा अर्थ संस्कार मानला तर हे वर्गातलं शिक्षण, ही अभ्यासक्रमाची चौकट, परीक्षापद्धतीची मर्यादा, याच्या पलीकडे गेलं पाहिजे. किंबहुना वर्गातल्या शिक्षणाइतकंच वर्गाबाहेर होणारे संस्कार, मुलांच्या सवयी, त्यांचं वागणं, बोलणं, चालणं, खेळणं, पोहणं, या सगळ्या गोष्टींचं महत्त्व आहे. थोडं एका टोकाला जाऊन मी तर असंही म्हणेन की ठराविक अभ्यासक्रम, परीक्षेतल्या श्रेणी, प्राविण्य यापेक्षाही मुलांच्या मनावर एकंदरीने घडणारे हे संस्कार अधिक महत्त्वाचे आहेत.

म्हणजे असं पहा, की मॅट्रिक पासून थेट एम्. ए., एम्. एस्सी. पर्यंतचे निकाल घेतले अन् त्यातल्या पहिल्या श्रेणीच्या, प्राविण्य मिळविणाऱ्या मुलांची संख्या घेतली तर त्यांचं प्रमाण किती ? हे प्रमाण ज्या शाळेचं, ज्या कॉलेजचं, ज्या संस्थेचं उत्तम ती संस्था उत्तम !

पण ही परीक्षेच्या निकालांची कसोटी फक्त मर्यादित अर्थाने खरी आहे. शाळा कशी असावी ? जिथे आत प्रवेश करताच मन प्रसन्न झालं पाहिजे, जिथे शिक्षकांना विद्यार्थ्यांविषयी प्रेम वाटलं पाहिजे ! शिक्षकांनी मुलांना सतत म्हटलं पाहिजे, 'या ! ही शाळा तुमची ! आम्ही सारे शिक्षक तुमच्यासाठी ! हे ग्रंथालय तुम्हाला बोलावतंय, हे वाचनालय तुमची वाट पाहातंय, ही पटांगणं तुमचा तास संपण्याच्या घंटीकडे कान लावून बसली आहेत, हा पोहण्याच्या तलावातला जलाशय तुम्ही जलक्रिडेसाठी याल म्हणून उत्सुक झालाय ! एन्. सी. सी., हे स्काउटचं पथक, हे सहलींचे कार्यक्रम, हा रेडिओ, हे वादविवाद मंडळ, हा आखाडा, ही क्रिकेटची बॅट, ही सगळी मंडळी तुमच्या भेटीसाठी, तुमच्या स्पर्शासाठी आसुसली आहेत ! ही चित्रशाळा ! हा हिंदीचा वर्ग ! या प्रयोगशाळा ! ही छंदशाळा ! सगळं, सगळं तुमच्यासाठी ! परीक्षेचा अभ्यास तर कराच ! पण या इतर गोष्टी कमी महत्त्वाच्या समजू नका ! प्रार्थनेच्या वेळचे सुविचार, वार्तापत्रक, गांधीजयंती, नेहरूंचा जन्मदिन, सिनेमा, जादूचे खेळ, गोष्टींचा तास, संगीत, सगळ्यात सहभागी व्हा ! हस्तलिखित मासिकात लेख लिहा, वक्तृत्वस्पर्धेत भाषण करा, निबंधांच्या चढाओढीत भाग घ्या ! ज्याला जे जमेल ते, जेवढं साधेल तेवढं ! तेही यशाची पर्वा न करता ! पण नाही कसं ? पहिला नंबर म्हणजेच यश नव्हे ! तुम्ही अनेक गोष्टीत सहभागी झालात हेच यश !

हे झालं मुलांचं यश. शिक्षकांचं यश कोणतं ? सगळ्या मुलांना यश मिळवून देणं, सर्वांवर जास्तीत जास्त संस्कार घडवणं, ज्ञान देण्यापेक्षा ज्ञानप्राप्तीचे मार्ग दाखविणं, प्रत्येकाची स्वतंत्र प्रज्ञा, स्वतंत्र प्रतिभा ओळखून त्या त्या गुणांच्या विकासाची दिशा दाखविणं, यातच शिक्षकांचं यश साठवलेलं आहे. ज्या शाळेत हे घडेल, तिथले शिक्षक विद्यार्थ्यांना घडवतील ! कुणी चित्रकार, कुणी वैमानिक, कुणी व्यायामपटू, कुणी व्यापारी ! इंजीनिअर, डॉक्टर, अंमलदार एवढीच कर्तबगारीची क्षेत्रे नाहीत. पत्रकार,

रेडिओ कलाकार, एअर होस्टेस, आर्किटेक्ट, इंटिरिअर डेकोरेटर, अशी किती तरी नवी क्षितिजं नव्या पिढीला उपलब्ध आहेत. उत्तम शाळेने या सगळ्या क्षेत्रात कर्तबगार युवक-युवती पुरविले पाहिजेत. एकेक तरुण म्हणजे चैतन्याचं भांडार! दुर्दम्य कर्तृत्वशक्तीचं पॉवर हाउस!

या पॉवरहाउसची बॅटरी चार्ज करून समाजातले सगळे दीप प्रज्वलित करायचं काम शिक्षणसंस्थांचं! अन् हे सगळ करताना शिस्तीचा बडगा ठेवायचा ती उगाच गंमत म्हणून! बाकी सगळं व्हायला पाहिजे ती नुसती गंमत! सगळ्याची एक लय साधली पाहिजे! सूर जमला पाहिजे! तालावर गीत, तालावर ड्रिल, तालावर खेळ, अभ्यास सुद्धा तालावर! सगळं कसं प्रसन्न, टवटवीत, गुबगुबीत! गुलाबपुष्पांच्या गुच्छासारखं! थुईथुई नाचणाऱ्या कारंजासारखं!

* * *

नागपूरच्या हडस हायस्कूलमध्ये हे सगळं अगदी असंच घडतं की नाही मला माहीत नाही. पण मी त्या शाळेत जातो तेव्हा मन प्रसन्न होतं. पांढरा शर्ट, निळी विजार, या गणवेशातल्या मुलांचे थवे पाहून फार बरं वाटतं. मग प्रिन्सिपाल सांगतात, आमचा तो अमुक अमुक विद्यार्थी खडकवासल्याच्या डिफेन्स अॅकॅडेमीसाठी सिलेक्ट झालाय! त्या एका विद्यार्थिनीचं इंग्लंडहून पत्र आलंय! त्या तिसऱ्याला सायन्स टॅलेंट शिष्यवृत्ती मिळाली आहे! ती परवा आय्. ए. एस्. झाली ना ती मुलगी आमच्याच शाळेची! ते तिघे जण महाराष्ट्रातर्फे ऑल इंडियात खेळायला गेले ते आमचेच!

आमचा मुलगा! आमची विद्यार्थिनी! तिचं नाव मुंबईपर्यंत, दिल्लीपर्यंत, 'यूनो'पर्यंत—अं हं! चंद्रावर! मंगळावर! पी. आर्. जोशीसर हेच मुलांना सांगतात! गेली पंचवीस वर्षं हेच चाललंय! त्या कार्याचाच तर आता रौप्यमहोत्सव!

माझी मुलं 'हडस'मध्ये जातात अन् संध्याकाळी घरी येऊन सांगतात, 'नाना! आज शाळेत सिनेमा होता! खूप छान!' 'आई, आज तीन मुलांनी सुविचार सांगितला नं, तो इंग्रजी, हिंदी, मराठी तीन भाषांत, पण विचार तोच!' 'आज आमची शाळा जिंकली!' 'आमच्या शाळेचा मोदी त्या वर्षी मॅट्रिकला पहिला आला होता नं त्यानं ज्युबिलीसाठी मोठी देणगी दिली!' 'आज बाईंनी खूप छान शिकवलं! शिकवलं म्हणजे नुसती गोष्टच सांगितली!' सगळी गंमत! सगळी मज्जा! सगळं किती छान! एकदम टॉप!

हडसचं हे 'एकदम टॉप' काम असंच टॉप राहू दे, अनेक चिमण्या पाखरांच्या अनेक पिढ्यांना मुंबईला, दिल्लीला, युनोत, चंद्रावर, मंगळावर जाण्याची, लयबद्ध, तालबद्ध, संगीतमय जीवन जगण्याची, सगळा आनंद लुटण्याची प्रेरणा मिळू दे, असंच कुणीही म्हणेल! रौप्यमहोत्सवानंतर, सुवर्णमहोत्सव, हीरक महोत्सव, अमृत महोत्सव, अन् मग—मग शताब्दी! आजची हडसची मुलं त्यावेळी अभिमानाने म्हणतील, 'पूर्वी...पूर्वी आमच्या वेळी ही शाळा किती लहान होती! आता कशी एखाद्या विद्यापीठाइतकी मोठी झालीय! पण पूर्वी काय अन् आता काय! हडसचं काम म्हणजे एकदम टॉप!'

अखेर एकच म्हणायचं! हडस हायस्कूल 'टॉप' आहे. तशाच आणखी काही 'टॉप' शाळा असतील! अशा 'टॉप' शाळांची संख्याच खूप वाढायला हवी! नव्हे, सगळ्याच शाळा टॉप असायला पाहिजेत! 'विन-टॉप' शाळा पाहिजेतच कशाला?

पण सगळ्याच शाळा 'टॉप' झाल्या तर हडसचं वैशिष्ट्य काय राहिलं? वा! राहिलं तर! ते असं की ती माझ्या मुलांची शाळा आहे! एक माझी शाळा टॉप! दुसरी मुलांच्या आईची शाळा टॉप! अन् आता आमच्या मुलांची शाळा टॉप!

एका पालकाचे विचार

मला नोकरीनिमित्त पुण्याहून नागपुरला जानेवारी १९६६ मधे यावे लागले. सर्वात मुख्य प्रश्न आमच्या चि. निरंजनच्या शिक्षणाचा होता. नववीचे वर्ष, पुणे व नागपूर येथील अभ्यासक्रमातील फरक, "पुण्याच्या विद्यार्थ्याला" "नागपूरच्या शिक्षकाकडून" कितपत मदत मिळेल, अशी वरीच काळजी वाटत होती. जरी दोन विषय नवीन होते तरी चि. निरंजनला पास होण्याची काळजी वाटली नाही. परंतु स्वारी जरा नरमच होती. श्री. जोशी यांच्याशी झालेल्या पहिल्या भेटीतच मला व चि. निरंजनला खूपच धीर आला. वार्षिक परीक्षेच्या तोंडी आला म्हणून शिक्षकवर्गाने खास लक्ष दिले व नववीत योग्य यश मिळू शकले. दहावीत तर शिक्षकवर्गाने त्याच्याकरिता फारच मेहेनत घेतली. त्याची फेड पूर्णपणे नाही तरी अंशतः वर नंबर मिळवून चि. निरंजनने केली.

पालकाला शाळेबद्दल काय वाटते ह्यासंबंधीचे माझे मत माझ्या मुलाला शाळेबद्दल काय वाटते ह्यावर विशेष अवलंबून असते. मार्क मिळवणे, वर नंबर येणे यापेक्षा शिक्षक मुलामधे आत्मविश्वास उत्पन्न करू शकले का व त्याचा आदर मिळवू शकले का हे जास्ती महत्त्वाचे आहे. माझा व हडस हायस्कूलच्या शिक्षकवर्गाचा जो फक्त सव्वा वर्षाचा संबंध आला त्यावरून "P. R." व चि. निरंजनचा शिक्षकवर्ग ह्या गोष्टी पूर्णपणे करू शकले असे मी खात्रीपूर्वक म्हणू शकतो.


व्य. कृ. परांजपे.
इंजिनिअर

२५–९–६७



शाळेच्या विद्यार्थ्यांनी स्नेहसंमेलनात सादर केलेल्या 'नीलपरी' नाटकातील एक प्रवेश

कै. बापूसाहेब हडस यांच्या वेळचे काही शिक्षक व विद्यार्थी



डावीकडून बसलेले—सर्वश्री १. एम. डी. भुसारी, २. एम. व्ही. फाटक, ३. जी. टी. परांडे, ४. पी. आर. जोशी,
गॅदरिंग सेक्रेटरी स्कूल कॅप्टन शिक्षक हल्लीचे प्रिन्सिपाल
५. एस. एच. तांबे, ६. एम. तिवारी, ७. एस. आर. मुळे, ८. आर. डी. म्हसकर, ९. एच. सी. लाडकर
सुपरिटेंडेंट शिक्षक शिक्षक जेष्ठ शिक्षक माजी विद्यार्थी

उभे रांग दुसरी—सर्वश्री १. डब्ल्यू. डब्ल्यू. चितळे, २. एन. एल. अगस्ती, ३. के. एस. तांबे, ४. पुरणकर
५. जुन्नरकर, ६. एस. डी. वैद्य, ७. एस. प्रयागी, ८. सी. एस. देव

उभे रांग तिसरी—सर्वश्री १. वागळे, २. देशपांडे, ३. एम. पी. साठे, ४. करमरकर, ५. एम. डब्ल्यू. कळमकर
६. व्ही. जोशी, ७. जोशी.

हडस हायस्कूल : शाळेचे विशेष

हडस विद्यालयातील चैतन्य व प्रसन्नता यांचा गाभा

संगीत

दि. १ जून १९६० या दिवशी संगीताचे आगमन होणे ही एक शाळेच्या इतिहासातील अभिनव व शुभ घटना मानली पाहिजे. शाळेतील मूलतःच असणारे शिस्तबद्ध, पवित्र व आगळे असे वातावरण ह्या संगीतमय लहरींनी प्रतिदिनी ठळकपणे अधिकच उजळून निघू लागले ! कोणत्याही कार्याची सुरवात मंगल ईशप्रार्थनेपासून व्हावी हे निःसंशय उचित होय. आमच्याही शाळेची प्रार्थना पूर्वनियोजित व रूढही होतीच; आमचे माननीय मुख्याध्यापक श्री. आप्पासाहेब जोशी हे अत्यंत कुशल व यशस्वी संयोजक व संगीतकलेचे एक मर्मज्ञ रसिकही पण आहेत; त्यांना मुख्यतः ही उणीव भरून काढण्याची प्रेरणा झाली व त्यांनीच संगीताला या संस्थेत योग्य स्थान दिले. हे श्रेय सर्वस्वी त्यांचेच आहे ! पहिल्याच दिवशी त्यांनी 'दया कर दान भक्ति का । हमें परमात्मा देना' या प्रार्थनेच्या ओळी माझ्या स्वाधीन केल्या व म्हणाले, "ही आमची प्रार्थना; आता ही ह्या विद्यार्थ्यांना शिकवा." मला हे करावेच लागणार, ही अगाऊ कल्पना असल्यामुळे त्या गीताला कोणत्या प्रकारे स्वरबद्ध करावे याविषयी मी आधी एक कच्चा आराखडा मनात योजिला होता व त्यांचा आदेश होताच प्रथम हार्मोनियमचा पांढरी दुसरी हा स्वर, पटांगणातील सुमारे हजार मुला–मुलींना हे गीत गाण्यास योग्य होईल असा कयास बांधून, सुरू करताच त्या शांत वातावरणात चैतन्याचा जणू काय नव्यानेच आविष्कार घडला ! तो नवीन स्वर त्या निरागस बालसमूहाला आकर्षित करू लागला, विद्यार्थी मेळाव्याला उद्देशून मी मोजक्या आवश्यक सूचना केल्या व प्रथम मी गीताची पहिली ओळ गाऊन दाखविली व तशीच ती त्यांनीही एकसाथ म्हणावी असे हसतमुखाने आवाहन करताच त्यांनी ती हुबेहुब गाऊन दाखविली—माझ्या आनंदाला पारावार राहिला नाही ! उरलेल्या ओळीही त्याच क्रमाने त्यांचेकडून गाऊन घेतल्या व अशा रीतीने मुलांच्या मनात एक उल्हसित भावना नव्याने निर्माण करणारी ही छोटीशी घटना यशस्वी झाली.

१९६० मध्ये वार्षिक स्नेहसंमेलनप्रसंगी शाळेतील मराठीचे अध्यापक श्री. श्री. शां. गुप्ते लिखित संगीत नाटक 'आहुती' विद्यार्थ्यांतर्फे सादर करण्याचे ठरले. त्यातील संगीताची बाजू मी मोठ्या हौसेने पत्करली. त्या काळची कु. हेमलता देशपांडे हिची भूमिकेतील सगळीच गाणी सुरेख झाली; त्याच नाटकात शाळेतील शिक्षिका श्री. सौ. सुहासिनी लाडकर यांच्याही भूमिकेतील कंठमधुर गीते—ही दोन्ही अविस्मरणीय होत.

१९६१ सालापासून शाळेतील बहुतेक वर्गांतील मुलींसाठी गायन हा एक ऐच्छिक विषय शिकविण्याची प्रथा सुरू झाली. एवढ्या मोठ्या विद्यार्थीसमूहाने एकसाथ गाणे, हा प्रयोग स्तुत्य खरा; पण वाटतो इतका तो सोपा नाही; कारण आपल्या देशात अनेक व्यक्तींनी एकसाथ एखादे गीत गाण्याची प्रथा आजही अभावानेच आढळते. अशा परिस्थितीत भारतीय संगीताचा ओनामाही अवगत नसणाऱ्या चंचल वृत्तीच्या बहुसंख्य शालेय विद्यार्थ्यांवर केवळ दोन चार मिनिटांच्या अवधीत स्वर–तालादी बंधने लादून एकसाथ एकादे गीत इच्छित स्वररचनेत त्यांना गायला लावणे हे साहस तर खरेच; पण त्याशिवाय



शाळेचो गायन चमू-जिल्हा परिषदेत झालेल्या माननीय श्रीमती इंदिरा गांधी यांच्या स्वागताचे वेळी

ते त्यांच्याचकडून आकर्षक रीत्या गाऊन घेणे हे एक विकट कार्य आहे असे आजही अनुभवांती मला वाटते. एक तर एवढ्या थोड्या वेळात विद्यार्थीसमेला गीतरचनेची निदान रूपरेषा स्पष्ट करून संथा देणे अशक्य असते; केवळ अनुकरण पद्धतीचाच अवलंब करून हा प्रयोग मला करावा लागला व आजही लागतच आहे. त्यातही कोणत्याही गीताची स्वररचना करण्याचे व ती गळी उतरविण्याचे कसब हे की ती त्यांना सहज अनुकरणीय वाटेल, अशा आकर्षक रीतीने सांगणे; स्वरांचे चढ-उतार त्यांना पेलवतील अशाच स्वरूपाचे ठेवणे व टप्पा-टप्याने ओळींची जुळवणी करीत ते गीत गायला लावणे इ. युक्त्या योजाव्या लागतात. कोणतेही गीत म्हणण्याचा आरंभक मूळ स्वर (षड्ज) अचूक ओळखल्यासच मुलांना ती चाल त्या विशिष्ट स्वरात उत्तम गाता येते. अशा रीतीने गेल्या सात वर्षांपासून हे सामूहिक गान शिस्तबद्धता व आकर्षक मांडणीमुळे शाळेचे एक वैशिष्ट्यपूर्ण अंग म्हणून प्रस्थापित झालेले आहे. ज्याचा उल्लेख केल्याशिवाय राहवत नाही अशी बाब म्हणजे विद्यार्थ्यांकडून नित्य होत असलेले राष्ट्रगीताचे गायन—'जन गण मन०'! १०००-१२०० विद्यार्थी राष्ट्राने नेमून दिलेल्या ५५ सेकंदांच्या अवधीत, नियत स्वररचनेत, स्वर-तालबद्ध असे व भारताचे अतुल वैभव उज्वलित करणारे गायन इतरत्र, इतक्या वर्षात माझ्या तरी ऐकिवात खास नाही! १९६० ते आज १९६७ अखेर अखंडितपणे निरनिराळे शेकडो विद्यार्थी दरवर्षी याच एका शाळेतून स्वतंत्र भारताचे निदान 'राष्ट्रगीत' हे एक तरी गीत, उत्तम आत्मसात करून बाहेर पडत आहेत! ही एकच घटना शाळेच्या उज्ज्वल लौकिकात National Integration च्या एकाच दृष्टिकोणातून पाहिली तरी कोणालाही भूषणास्पद अशीच वाटेल! म्हणून आजी व माजी सगळ्याच विद्यार्थ्यांचे हे यश खरोखर अभिनंदनीय होय!

ह्याच अनुषंगाने विशेष उल्लेखनीय घटना अशा की शालेय कार्यक्रमाव्यतिरिक्त शहरातील इतर सरकारी व खाजगी संस्थाप्रमुखांकडून आमच्या विद्यार्थिनींना खास निमंत्रणे आली व त्यांच्या कार्यक्रमासाठी अनेक प्रसंगी निरनिराळ्या रागरचनेतील गीते मी रचून त्यांच्याकडून सादर केली गेली आहेत. अशा सर्व प्रसंगी त्या सर्व संस्थांकडून मुलींना पारितोषिके मिळून त्यांचा यथायोग्य गौरव झालेला आहे. माननीय दिवंगत प्रधानमंत्री श्री. लालबहादुर शास्त्रीजीसाठी मुलींनी गायिलेले स्वागत गीत-'जाग जाग भाग हमारे०' सांप्रतच्या **माननीय प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी** यांचे स्वागतगीत (७ मे १९६६); १९६१ पासून प्रतिवर्षीच्या 'महाराष्ट्र दिनाप्रीत्यर्थ गायिलेले 'महाराष्ट्र गीत'; माजी माननीय राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् यांचे सत्कार समारंभात गायिलेली सरस्वती प्रार्थना 'या कुंदेंदु०' इ. किती तरी गीतांच्या द्वारे मुलींनी शाळेबाहेर शाळेच्या लौकिकात अमोल अशी भर घातलेली आहे. आकाशवाणी-नागपूर केंद्राधिकारी यांजकडून निरनिराळ्या समरगीतांची, राष्ट्रीय गीतांची अनेक ध्वनिमुद्रणे होऊन ती जनतेला ऐकवून लोकप्रिय ठरलेली आहेत.

१९६४ सालची फेब्रुवारी मधील एक हृद्य घटना अशी की, जिल्हा परिषद, नागपूर यांचे वतीने त्यांच्या 'ग्रामहित' मासिकाचा उद्घाटन समारंभ त्यावेळचे मुख्य मंत्री व रसिकाग्रणी माननीय श्री.

यशवंतराव चव्हाण ह्यांच्या शुभहस्ते झाला — ह्या प्रसंगी शिक्षणाधिकारी यांच्या आदेशावरून अत्यंत अल्पावधीत शाळेतील शिक्षक श्री. श्री. शां. गुप्ते यांनी 'आमोदे प्रेमभरे करुनि स्वागताला' हे सुंदर गीत रचिले; तेवढ्याच अल्पावधीत माननीय प्रिं. श्री. अप्पासाहेब जोशी ह्यांच्या खास देखरेखीखाली त्याची राग दरबारी कानडयात मी स्वररचना गुंफली व केवळ १० मिनिटांच्या आत कु. निर्मला लोंढे, कु. शोभा रानडे, कु. अंजली शेवडे, कु. अरुणा शेवडे, कु. अलका लोणकर, कु. अलका माने, शोभा खासनीस ह्या मधुर आवाजाच्या हुशार मुलींनी ते आत्मसातही केले! ह्या त्रिवेणी संगमाचे दृश्य फल असे की ते रसपरिपोषक गायन सुरू होताच रसिक श्री. यशवंतरावजींची डोलायमान मूर्ति एकसारखी सादच देत राहिली! तत्क्षणीच त्यांनी वरील सर्व मुलींचा व आमच्या शाळेचा उत्स्फूर्त व मुक्तकंठाने गौरव केला! आजच्या ह्या संस्थेच्या रजत महोत्सवाच्या मंगल दिनी त्या प्रसंगाचे ते गीतगुंजन मला ऐकू येत आहे व त्याची नोंद मी करून ठेवीत आहे.

'दख्खनची तलवार मराठी म्यानातुनि बाहेर पडे!' हे आवेशपूर्ण गीत तर आमच्या मुलींनी अक्षरशः गाजविले! माननीय श्री. यशवंतराव चव्हाण यांनी संरक्षण मंत्रिपद भूषविले त्यावेळी त्यांचा नागपूरने केलेला सत्कार समारंभ — चांदीची तलवार त्यांना अर्पण होत असतानाच आमच्या मुलींनी त्यांना 'दख्खनची तलवार' गीत स्वरूपातच बहाल करून मानाचा मुजरा केला! ह्या गीताचे आवेशपूर्ण गायन प्रात्यक्षिक १९६५ सालच्या नाग असो. च्या आंतरशालेय स्पर्धेत होऊन त्याला प्रथम क्रमांकाचा बहुमान मिळाला व शाळेलाही ह्या गीताने भरीव यश प्राप्त करून दिले! 'जय हो, जय हो, जय हो' हेही असेच एक प्रभावी राष्ट्रीय गीत शाळेतील सगळेच विद्यार्थी सतत गेली सात वर्षे मोठ्या आवडीने गात आहेत. अशा तऱ्हेने आज शाळेतील सर्व विद्यार्थीगण निदान २५–३० गीते संथा घेऊन उठावदारपणे म्हणू शकत आहेत याचा आनंद होतो. विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाबरोबरच किंचित् प्रमाणात त्यांच्यावर सक्तीही करून त्यांच्या अंगी राष्ट्रप्रेमाचा अंकुर बाणावा व शाळेतील वातावरण त्यांच्याच करवी प्रसन्न व्हावे ही आमची



समूहगीत स्पर्धा विजेती चमू

तळमळ विद्यार्थीवर्गाने पुष्कळ अंशी — ही गीते गाऊन सफल केलेली आहे ही — माननीय प्रिं. जोशी साहेबांना व आम्हा सर्व शिक्षक बंधु–भगिनींना सतत समाधानाची घटना वाटत आली आहे. माझे परमपूज्य गुरुवर्य संगीतकलानिधि मास्टर कृष्णराव ह्यांचे असामान्य स्वररचनाकौशल्य महाराष्ट्रात गेली ४० वर्षे विख्यात आहे — त्यांनीही खास विद्यार्थ्यांसाठी रचलेली काही निवडक राष्ट्रीय गीते मी आमच्या विद्यार्थ्यांना शिकविलेली आहेत — व अशा सर्व गीतांचा संग्रह पुस्तिकेच्या रूपात प्रिं. साहेबांनी विद्यार्थ्यांसाठी नुकताच प्रसिद्धही केलेला आहे. या पुस्तिकेत ज्या सर्व थोर कवींनी संस्थेला, ती छापण्याची संमती दिली त्या सर्वांचे आम्ही आभारी आहोत. स्वर–राग हे प्रसन्नतेचे तर लय–ताल हे चैतन्याचे मूर्तिमंत जनकच होत व त्यांच्याच आविष्कारातून विद्यार्थ्यांची या विषयात एवढी तरी प्रगति होऊ शकली.

१९६६ डिसेंबर – ६७ जानेवारीत महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री माननीय श्री. मधुकरराव चौधरी यांनी संगीताची अमोघ शक्ती अचूक ओळखून रणांगणावर (भारत–पाक युद्ध) लढणाऱ्या शूर जवानांना – विद्यार्थीवर्गाकडून आपापल्या कार्यक्षेत्राच्या बिंदूवर राहूनही स्फूर्ती देण्याचे कार्य घडविण्याचे ठरविले — व त्यासाठी महाराष्ट्रातील सर्व मोठ्या संगीतशिक्षकांचे एक सहा दिवसांचे शिबिर त्यांनी मुंबईला आयोजित केले—

सुप्रसिद्ध संगीतदिग्दर्शक श्री. वसंत देसाई ह्यांनी समरगीते विद्यार्थ्यांना कशी शिकवावी याचे सुंदर मार्गदर्शन केले. ह्या शिबिरास उपस्थित राहून शिकण्याची सुसंधी या संस्थेच्या वतीने मला लाभली हे माझे मी सद्भाग्यच मानतो — नंतर संस्थेत त्या गीतांची सर्वच विद्यार्थ्यांना मी संधाही दिली व तो 'जयनाद' कित्येक दिवसपर्यंत घुमतच राहिला. अशा या स्तुत्य उपक्रमाच्या चालनेस जर स्थायी स्वरूप आले असते तर सर्व महाराष्ट्रातील बहुसंख्य विद्यार्थ्यांत शिस्त, राष्ट्रीय भावना, ऐक्य इ. बहुमोल गुणांची निश्चित भर पडली असती हे निर्विवाद ! — अजूनही तो प्रयत्न जरूर व्हावा — हीच सदिच्छा !

स्वर व ताल यांच्या सेवेत सदोदित घुंद रहाणाऱ्या माझ्यासारख्या सामान्य सेवकाला हे कार्य करीत असताना सतत सहकार्य मिळत आले ते माझे सहकारी तालशिक्षक श्री. गिल्लरकर यांचे ! मुलींसाठी अगर सर्व विद्यार्थ्यांसाठी — कोणतेहि गीत–प्रात्यक्षिक या संस्थेत सतालच होत असते ! कारण ताल हा संगीताचा एक मोठाच काटेकोर नियंता होय ! पण — श्री. गिल्लरकर यांची तालाची संगत नेहमीच मृदु, लयबद्ध व उठावदार होते. त्याचा आम्हा सर्वांना लाभ मिळतो व ह्याचे श्रेय अर्थातच् मी त्यांना देत आहे.

नेहमी विद्यार्थ्यांसाठी एखादे तरी नवीन प्रेरक गीत शोधून ते स्वरबद्ध करावे व त्यांना हौसेने शिकवावे ही एकच तळमळ मी सतत बाळगीत आलो आहे व पुढेही ती तशीच कायम राहील; ह्याबाबत मुख्यतः प्रिं. जोशी साहेबांचे मला सतत मनापासून प्रोत्साहन मिळत आले आहे व पुढेही ते राहीलच. हा ऋणनिर्देश मी आज कृतज्ञ अंतःकरणाने प्रकट करून माझे पवित्र कर्तव्य पार पाडीत आहे !

शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचा हा आवेश, सुप्त संतुलित मनोवृत्ती, ही तत्परता, शिस्तबद्ध वागणूक, या सर्व गुणांचे कौतुक प्रिं. जोशीसाहेब सतत करीत आले आहेत व तसे ते अवश्य व्हावे असे मलाही प्रांजलपणे वाटते. थोडक्यात, आमच्या विद्यामंदिरातील ही संगीत प्रथा म्हणजे साक्षात् श्रीशारदेची विद्यार्थीगण व शिक्षकगण यांजकडून नित्यनेमाने होणारी निरलस उपासनाच होय अशी आमची दृढ श्रद्धा आहे !

वेगळ्याच प्रकारच्या या शिक्षणविभागात आणखी कितीतरी कार्य करण्याची सदिच्छा व उमेद मला आहे — त्याची जाणीवही सदैव आहे. ही सेवा सातत्याने माझ्याकडून घडण्याचे सामर्थ्य ईश्वराने मला द्यावे एवढीच त्याचे चरणी प्रार्थना आहे.

दिनकर सखाराम खानवाले
गायन शिक्षक

हडस हायस्कूल, नागपूर यांच्या रजत-महोत्सवानिमित्त
सर्व कार्यकर्त्यांचे हार्दिक अभिनन्दन !

सुविचार प्रकाशन मंडळ

धनतोली, नागपूर १ : फोन २४७९६

शालेय आणि इतर वाचनीय पुस्तकांचे महाराष्ट्रातील अग्रगण्य प्रकाशक

— आजच सूची मागवा —

हडस हायस्कूलची चित्रकलेमधील प्रगती

मी स्वत: १ जुलै १९५९ ला हडस हायस्कूल या संस्थेत आलो. आणि त्याचवर्षी 'ड्राईंग ग्रेड' परीक्षांचे सेंटर शाळेला मिळाले. त्यानंतर १९६० व १९६१ साली मॅट्रिकला चित्रकला विषय घेऊन परिक्षेला बसणारे विद्यार्थी होतेच. या विषयाचा वरील तिन्ही वर्षीचा निकाल शेकडा १००% लागला. परंतु बोर्डाचे अभ्यासक्रमात चित्रकला विषय, सायन्स घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ग्रुपमध्ये बसत नसल्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या मॅट्रिकला रोडावली व मॅट्रिकला चित्रकला विषय बंदच पडला. चित्रकलेचा उपयोग सायन्स घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढे मुख्यत: होतो.

शाळेव्यतिरिक्त बाहेर होणाऱ्या चित्रकला, हस्तकला स्पर्धांत देखील आतापर्यंत बहुसंख्य विद्यार्थ्यांनी भाग घेतला असून बक्षिसे मिळविली आहेत. त्यांचा उल्लेख करावयाचा झाल्यास—

महाराष्ट्र राज्य चित्रकला शिक्षक परिषद १९६५ साली नागपूरला भरली असताना या परिषदेतर्फे झालेल्या चित्रकला प्रदर्शनात आमच्या शाळेच्या बी. बी. गुळकरी या विद्यार्थ्यास द्वितीय क्रमांकाचे बक्षिस मिळविण्याचा मान प्राप्त झाला.

तसेच 'महाराष्ट्र राज्य चित्रकला प्रदर्शन' १९६० साली पटवर्धन हायस्कूल येथे नागपूरला झाले. त्यावेळी आमच्या शाळेतील हायस्कूल विभागातील राजन मेश्राम या विद्यार्थ्यास १५ रुपयांचे व मिडलस्कूल विभागातील नंदुदा मेश्राम या विद्यार्थ्यास २५ रु. चे बक्षिस मिळाले होते.

अखिल भारतीय हस्तव्यवसाय सप्ताहात होणाऱ्या हस्तकला व चित्रकला स्पर्धेत एन. एच. रामटेके या विद्यार्थ्यास कागदी फुलांच्या स्पर्धेत १९६१ व १९६२ साली प्रथम क्रमांकाचे बक्षिस मिळाले होते.

तसेच १४ नोव्हेंबर १९६४ ला नेहरू जयंती-निमित्त राजाराम वाचनालयात झालेल्या बालचित्रकला स्पर्धेत आमच्या शाळेच्या उदय वामनराव करंजकर यास प्रथम क्रमांकाचे बक्षीस व कु. गीता वामनराव करंजकर हिला दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री माननीय वसंतराव नाईक यांचे हस्ते देण्यात आले होते.


Children Art Exhibition 1962 मधे नागपूरला झाले त्यात कु. मीना ताम्हने हिला पहिल्या क्रमांकाचे बक्षिस मिळाले होते.


दरवर्षी 'मॉनिटर क्लब' नागपूर तर्फे बाल-चित्रकला स्पर्धा आयोजित केल्या जातात. ह्या स्पर्धेत शाळेचे विद्यार्थी बहुसंख्येने भाग घेत असतात. त्यांपैकी १९६५ ला आमच्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी सर्वात जास्त बक्षिसे मिळविली. त्यांत बक्षिस मिळविणारे उदय वामनराव करंजकर, कु. गीता करंजकर, विश्वास नामदेवराव डिखोळे, अरुण मांडे, हेमंतकुमार पाटील, संजय अनंत एकताटे हे विद्यार्थी प्रामुख्याने आहेत.

विदर्भ साहित्य संघातील कला केंद्रातर्फे बाल-चित्रकला स्पर्धा याच वर्षी म्हणजे १९६७ ला झाली. त्या स्पर्धेतील निवडक १० चित्रे रशिया येथे होणाऱ्या प्रदर्शनाकरिता निवडण्यात आली. या १० चित्रांपैकी ४ चित्रे आमच्या शाळेच्या कु. गीता करंजकर, उदय करंजकर, विश्वास डिखोळे, कु. अलका टिकेकर या विद्यार्थ्यांचीच आहेत.


शिक्षण खात्यातर्फे दरवर्षी नागपूर येथे शिक्षण सप्ताह पाळण्यात येतो. या सप्ताहात चित्रकला, हस्तकला, सायन्स प्रदर्शन आयोजित केल्या जाते. या स्पर्धांत आमच्या शाळेचे विद्यार्थी बहुसंख्येने भाग घेऊन बक्षिसे मिळवितात. १९६४ साली नागपुरातील ज्या शाळांनी भाग घेतला होता त्या सर्व शाळांमधून हस्तकला व चित्रकला स्पर्धेत सर्वात जास्त गुण आमच्या शाळेला मिळून फिरती ढाल मिळविण्याचा मान आम्हाला मिळाला.

विदर्भ सा. संघाच्या कलाकेंद्राच्या वतीने झालेल्या स्पर्धेत रशियात पाठविण्यासाठी निवड झालेली ४ चित्रे व बालचित्रकार






विश्वास डिखोळे





उदय करंजकर






कु. गीता करंजकर

विद्यार्थ्यांना चित्रकलेचे प्रोत्साहन देण्याचे उद्देशाने प्रत्येक वर्गात उत्तम चित्रांचे फोटो लावण्यात येत असून उत्तमोत्तम कलाकृती विद्यार्थ्यांनी पाहाव्यात म्हणून शाळेच्या प्रमुख जागी काचेत नियमितपणे चित्रे लावण्यात येतात. त्यामुळे देखील त्याचा परिणाम विद्यार्थ्यांचे मनावर होऊन त्यांना न कळत प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न आमची शाळा करीत असतेच. सहलीचे वेळी देखील विद्यार्थ्यांना नयनरम्य दृश्ये त्यांच्या नजरेस आम्ही आणीत असतोच आणि अशी नयनरम्य दृश्ये टिपण्यास शाळेस सध्याच्या स्थितीत स्वतःचा कॅमेरा असण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

शाळेत ड्रॉईंग ग्रेड परिक्षांचे सेंटर १९५९ पासून झाले. त्या वेळेपासून आतापर्यंत ड्रॉईंगच्या एलिमेंटरी ग्रेड परिक्षेस २०४ विद्यार्थी शाळेतून बसले व त्यांपैकी १५१ विद्यार्थी पास झालेत. तसेच इंटरमिजीएट ड्राईंग ग्रेड परिक्षेला ११९ मिद्यार्थी बसले व त्यांपैकी ८५ विद्यार्थी पास झाले. शाळेचा या परिक्षेचा निकाल दरवर्षीला शेकडा ८० ते ९५ च्या दरम्यान राखण्याचा प्रयत्न कसोशीने केल्या जातो. या परिक्षांचे वर्ग जुलै, ऑगष्ट व सप्टेंबर या तीन महिन्यांत चालून विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन करण्यात येत असते.

दा. ल. मांडवगडे
चित्रकला शिक्षक





कु. अलका टिकेकर

With Best Compliments


From

Estd:—1930


Phones :
Shop : 24754
Resideuce : 32482

Bimal Sports Co.,
Sitabuldi, NAGPUR–1
House for Quality Sports Goods

एन. सी. सी. पथक १९५६-५७



एन. सी. सी. पथक १९६७-६८




शालेय एन. सी. सी. वृत्तान्त

रौप्यमहोत्सवाच्या शुभ प्रसंगी, मी आपणास, विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनात, भविष्याची मुहूर्तमेढ ठरणाऱ्या अनेक कार्यक्रमांपैकी आज नॅशनल कॅडेट कोअरचे सर्वविदित महत्वाबद्दल सांगणार आहे. राष्ट्रसंरक्षणाची दुसरी फळी (Second line of Deffence म्हणून राष्ट्रास आज एन. सी. सी. ची मदत होत आहे.

सर्वांगीण प्रगती व्हावी म्हणून विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमता, चारित्र्य, आत्मविश्वास, बंधुभाव, पुढाकार इत्यादींची जोपासना व वाढ तरुण विद्यार्थ्यांत होणे अत्यावश्यक असते. त्या दृष्टीने आमच्या शाळेतील एन. सी. सी. पथकाचे कार्य अभिमानास्पद आहे.

ह्या पथकाची १९५५ च्या जानेवारीला राज्य सरकारच्या खास पत्रकानुसार सुरवात झाली. एन. सी. सी. च्या विशिष्ट गणवेषात विद्यार्थी–सैनिकास पाहून प्रत्येकांना त्याबद्दलचे वैशिष्ट्य दिसून येते. मर्यादित संख्येपर्यंत विद्यार्थ्यांना प्रवेश असल्यामुळे प्रत्येक वर्षी प्रवेशाच्या बाबतीत अनेकांना नकार द्यावा लागतो. ह्यावरून एन. सी. सी. बद्दलची विद्यार्थ्यांना आवड किती तीव्र आहे हे दिसून येईल.

सुरुवातीच्या काळात एन. सी. सी. पथकात कॅडेट संख्या ३३ होती, नंतर ४५ आणि ५० पर्यंत



उत्कृष्ट सार्जंट कुमार आनंद रानडे



सर्वोत्कृष्ट एन. सी. सी. सार्जंट अजय रानडे

वाढविण्यात आली. आज ही संख्या दर वर्षाला १०० पर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

माध्यमिक शाळेतील जूनिअर एन. सी. सी. चे प्रशिक्षण दोन वर्षांच्या कालावधीचे असते. ह्या काळात पूर्वी कॅडेटला प्रत्येक वर्षी कॅम्पमध्ये भाग घ्यावा लागत असे. परंतु १९६२ पासून प्रत्येकास दोन वर्षांच्या प्रशिक्षणाच्या काळात फक्त एकदाच वार्षिक कॅम्पला उपस्थित असावे लागते. जर कॅडेट उपस्थित नसेल तर त्याला एन. सी. सी. प्रमाणपत्र परीक्षेस बसता येत नाही.

पूर्वी एन. सी. सी. कॅम्पचे आयोजन स्पर्धेच्या स्वरूपात होत असे परंतु सध्याचे कॅम्प प्रशिक्षणाच्या पद्धतीने होत असतात.

आमच्या हडस विद्यालयातील एन. सी. सी. पथकाचे सुरवातीपासूनचे प्रमुख म्हणून फर्स्ट ऑफीसर श्री. वा. ह. जोशी ह्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय होते. त्यांच्या योग्य मार्गदर्शनामुळे अनेक कॅम्प स्पर्धेत व इतरत्र आमच्या शाळेच्या एन. सी. सी. कॅडेटपैकी A. O. श्री. रानडे ह्यांच्या तिन्ही मुलांची लागोपाठ तीन वर्षाकरता सर्वोत्तम कॅडेट व Repubhic day parade साठी झालेली निवड प्रामुख्याने सांगता येईल.



उत्कृष्ट एन. सी. सी. सार्जंट कुमार अभय रानडे

स्थानिक केंद्रिय विद्यालयात श्री. वा. ह. जोशी ह्यांचे स्थानांतर झाल्यामुळे माझी कामठी येथील

N. C. C. O. T. S. केंद्रात एन. सी. सी. ऑफिसरच्या प्रशिक्षणासाठी निवड झाली; तसेच १९६६ च्या ऑगस्ट महिन्यापासून एन. सी. सी. ऑफिसरच्या जागी नेमणूक करण्यात आली.

ह्या एका वर्षाच्या काळात आमच्या शाळेतील विद्यार्थी कुमार विलास हर्षे याची नागपूर विभागातून Rock-Climbing च्या उत्तरकाशी येथील प्रशिक्षण कॅम्पसाठी झालेली निवड अभिमानास्पद घटना आहे.

आजवर N. C. C. घेऊन एस्. एस्. सी. परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्याला ज्यादा गुण दिले जात असत. संक्षेपात असे सांगता येईल की सुरवातीपासून ह्या वर्षापर्यंतच्या अवधीत कित्येक एन. सी. सी. कॅडेट आज अनेक क्षेत्रात उच्च शिक्षण घेत असून त्यापैकी श्री. विजय जोशी हे भारतीय वायुदलात अधिकारी पदावर स्पृहणीय कामगिरी बजावीत आहेत. त्यामुळे शाळेची शिस्त, कर्तव्यतत्परता इत्यादी बाबतीत कीर्ती दुंदुमत आहे.

टी. एस. हेडाऊ

मुलींची एन. सी. सी. चमू १९६६-६७



मुलींची एन. सी. सी.

'की घेतले व्रत न हे अम्हि अंधतेने'



सौ. लाडकर मुलींच्या एन. सी. सी. प्रमुख

आमच्या शाळेत १९६५ साली मुलींच्या N. C. C. युनिटला परवानगी मिळाली. ६५–६६ ह्या वर्षी मी हे काम हाती घेतले. पहिल्या वर्षी ६५ मुलींनी यात प्रवेश मिळविला. त्यांचे प्रशिक्षण सुरू झाले. मुली आपले शालेय शिक्षण सांभाळून N. C. C. चा अभ्यासक्रम व्यवस्थितपणे पार पाडतात. यंदाचे दुसरे वर्ष. यंदा ३६ मुलींना प्रवेश मिळाला. मागील वर्षीच्या काही मुली प्रकृती अस्वास्थ्यामुळे ह्या प्रशिक्षणाचा अभ्यास मधेच सोडून गेल्या पण तरीही यंदा एकूण ८१ मुली दर गुरुवार व शुक्रवार सकाळी ७ वाजता परेडला हजर असतात. युनिफॉर्ममुळे ह्या मोठ्या उत्साही व तेजस्वी दिसतात.

हे काम करण्यास प्रशिक्षित स्त्री–शिक्षिकेची आवश्यकता असते. त्यामुळे मला ६६–६७ मध्ये ग्वाल्हेर येथे दोन महिन्याकरिता प्रशिक्षणाला जावे लागले. मुलींच्या अभ्यासक्रमाप्रमाणेच आमचाही अभ्यासक्रम होता.

दरवर्षी एकदा मुलींना बाहेरगावी शिबिराकरिता १० दिवस जावे लागते. तेथे स्वावलंबन, एकी, प्रामाणिकपणा, निर्भीडता आणि आज्ञाधारकपणा या गुणांची अत्यंत आवश्यकता असते.

मागीलवर्षी आम्ही कामठीला व यंदा टाकळी सेवाश्रम येथे कॅम्पला गेलो होतो. तेथे आपल्या मुली उत्तम रीतीने वागल्या व काही बक्षिसे मिळविली. यंदा २६ जानेवारीच्या दिल्ली येथे होणाऱ्या परेडकरिता कु. अलका तांबे हिची राखीव जागेकरिता निवड झालेली आहे.

T./O. Mrs. S. Ladkar
Troop Commander
Third Mah. G. BN. N. C. C.




'आहुती' नाटकात भाग घेतलेल्या विद्यार्थिनी



वक्तृत्व पारितोषिक विजेती
कु. चित्रा आमटे

मुलींची एन. सी. सी. १९६७–६८





कै. दादासाहेब कन्नमवार ढाल वक्तृत्वस्पर्धा विजेता
कुमार संदीप चांदोरकर, वर्ग ५

वक्तृत्व विजेती चमू



Our Swiming Pool


A swimming pool is normally the last on the list of amenities to be provided by schools for their students. However, it was the other way round in the case of the Hadas High School and this can be said today with a degree of reasonable pride. The swimming pool in fact marked the beginning of the edifice that stands today on the land owned by the Hadas High School.

The plot of land was generously gifted to the School by the erstwhile Madhya Pradesh Government with its head quarters at Nagpur then. Even as the plans for the school-building were being drawn by the architect, the Principal of the School, Shri P. R. Joshi studied the Campus Work Projects Scheme introduced by the Union Education Ministry. The aid sought by him under the Scheme was granted to the School and in terms of it, the Swimming Pool was constructed with 'Shramdan' by the students and members of the staff. Students of other schools, too, lent a hand, and the co-operation received from the Dharampeth High School, Saraswati Vidyalaya, Somalwar High School and Sule High School deserves a mention.

The Swimming Pool was declared open by Mr. Bhagwantrao Mandoli, Education Minister of then M. P. Government on 19th of April, 1956. After the States Reogranization, the swimming Pool received some aid from the Social Welfare Department of Maharashtra Government, but for the last several years it has been entirely a self-supporting amenity.

From the very beginning, the objective has been to initiate school-children to the art of swimming. It is essentially a swimming pool for novices. On an average about 200 children and adults have learnt swimming at our Pool every year and one of the aims is that every student of Hadas High School should be a swimmer.

From the very beginning, the Swimming Pool has been fortunate in getting the co-operation of experienced and enthusiastic swimmers in the city for helping children and others to learn swimming. Though the objective, as already mentioned, is to initiate youngsters to the art of swimming, the guidance given at our Swimming Pool has stood the swimmers in good stead later while taking part in the Nagpur University Swimming competitions. The present holders of the Nagpur Universlty free style and breast and back strokes records—Prakash Sarpotdar and Abhay Ranade—have had their first lessons in our swimming Pool. The members of other leading teams like the Govt. Polytechnic, Dhanwatay National College, Govt. College of Science and the Govt. College of Agriculture have also practised at our Swimming Pool during their training for the University competitions. The swimmers from the Pool have also done well in the inter-school competitions and in the YMCA open aquatic meets.




हडस विद्यालयातील पोहण्याचे टाके



नागपूर विद्यापीठ–पोहण्याचे चॅंपियन प्रकाश सरपोतदार व अभय रानड



श्री. भाऊसाहेब सोमपूरकर



पोहण्याच्या स्पर्धेतील विजयी चमू

In the past prominent citizens like the late Shri Dadasaheb Shevde, Shri Madan Gopal Agarwal (Mayor of Nagpur then), Shri. E. Prabhakar (of Burmah Shell and India's Olympic sprinter), Dr. P. N. Pradhan, Shri. D. C. Sutaria, Shri. V. A. Apte, Dy. Director of Education, and others have presided over the Annual Day functions.

The report on the Swimming Pool would be incomplete without the mention of the valuable and voluntary co-operation received from Sarvashri Bhau Sompurkar—he is there every morning and evening unfailingly—Prof. Y. D. Kane, Narayanrao Saney, Vishnupant Godbole, Dr. and Mrs. Sheorey, Miss Devi Punwani, Mr. Dandekar, Mr. Haribhau Ladkar, Mr. W. W. Pande, W. H. Joshi, A. P. Joshi and also from Architect Patekar, Vinay Kolte, Pande and other students who have been helpful to the teachers.


G. T. Parande

Students Fruit Products

हा उद्योग शाळेतच चालविला जातो. हा उद्योग फक्त उन्हाळ्यात करावयाचा असल्याने मुले सुट्टीत आनंदाने काम करू शकतात. दोन महिने मुले शाळेत तज्ज्ञांच्या देखरेखीखाली कामे शिकतात. ह्यात निरनिराळी सरबते व फळांचे टिकाऊ पदार्थ करतात. उदा. Orange squash; Lemon Squash; Lemon Barley; Khus; Rose; Rasbury Pamogranate Syrup. ets. "Students Fruit Produets" Nagpur; ही संस्था सरकार-मान्य असून तिचा लायसेन्स नं. N. C. P. 319 असा आहे. ऑल इंडिया फ्रूट प्रिझर्व्हर्स–असोशियेशनतर्फे आयोजित केलेल्या स्पर्धेत दोनदा बक्षीस मिळविलेली ही संस्था आहे. ही सरबते स्वस्त किंमतीत शाळेत उपलब्ध असतात. एवढेच नव्हे तर मुले घरपोच देतात. याशिवाय नागपुरातील काही दुकानांमध्ये देखील हा माल उपलब्ध असतो.

श्री. ह. चं. लाडकर
प्रोप्रा. स्टूडंट्स फ्रुट प्रॉडक्ट्स

हडस हायस्कूल स्काउट पथक १९६७-६८



*



स्काउट पथकाची विना येथील सहल

भारत स्काऊट ॲन्ड गाईडस्


अगदी सुरवातीपासून या शाळेत वालवीर चळवळ चालू आहे. मी ज्यावेळी विद्यार्थी होतो त्यावेळी म्हसकर यांच्या नेतृत्वाखाली ही संस्था काम करीत होती. त्यावेळचे वालवीर पथक ऑफ इंडिया, जांबुरी, कराची येथे जाऊन आले. आमच्या शाळेचे प्राचार्य श्री. पु. रा. जोशी हे स्टेट स्काऊट कमिश्नर होते. त्यामुळे त्यांना स्वतःला ह्या विषयात फारच आवड आहे. म्हणूनच त्यांनी आपल्या शाळेतील ही संस्था चालू ठेवण्याची व्यवस्था केली.

काही वर्षे श्री. महाजन ह्यांनी काम केले. त्यानंतर मला स्काऊट मास्टरच्या प्रशिक्षणाकरिता पाठविण्यात आले. मागील वर्षी एकूण साठ मुलांनी ह्या पथकात प्रवेश मिळविला. त्यापैकी ३२ मुलांना कब टेडरफूट, सेकंडक्लास असे वर्ग देण्यात आले आहेत. ह्या परीक्षांत ही मुले उत्तीर्ण झाली आहेत.

ह्या मुलांचे वर्षातून जवळजवळ ४ कॅम्प झाले. त्यांपैकी एक शिबिर हिंगण्याला झाले व बाकीची शिबिरे नागपूरला झाली.

डिस्ट्रिक्ट रॅलीमधे आमच्या शाळेच्या मुलांनी भाग घेतला होता. त्यात त्यांना ८ (आठ) प्रशस्तिपत्रके मिळाली.

ह्या वर्षीही काम जोराने चालू आहे. सध्या ६० मुले वालवीर पथकात आहेत. यावर्षी डिसेंबर महिन्यात



कल्याणी येथील जांबोरीसाठी निवड झालेले स्काउट


कल्याणी, कलकत्ता येथे जांबुरीला जाण्याकरिता ४ मुलांची निवड झाली आहे. दर सोमवारी व गुरुवारी सायंकाळी ह्या मुलांना शिक्षण देण्यात येते. ३२ मुले वालवीराचा युनिफॉर्म घालून येतात.

शाळेत कॅम्पला लागणारे व स्काऊटविषयक इतर सर्व सामान आहे. उदा०—तंबू, स्वयंपाकाची भांडी, बॅन्ड इत्यादी.

स्काऊटचे एक ग्रंथालय असून त्यात जवळपास २०० पुस्तके स्काऊटविषयक माहिती देणारी आहेत. कै. काळे, ऑर्गनायझर भारत स्काऊट ॲन्ड गाईड, यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या मुलांनी ही पुस्तके शाळेला भेट म्हणून दिली.


शाळेच्या कोणत्याही कार्यक्रमाच्यावेळी वालवीर मुलांत शांतता राखण्याचे काम आवडीने करतात.

श्री. ह. चं. लाडकर
स्काऊट शिक्षक



स्काउट पथकाची एक सहल

इंडियन रेडक्रॉस सोसायटी



हडस हायस्कूलचे रेडक्रॉस पथक

या संस्थेच्या वतीने एक छोटेसे १० मुलांचे युनिट आमच्या शाळेत उघडले आहे. हया मुलांना आठवडयातून दोन दिवस प्रथमोचार देण्याचे शिक्षण मिळते. त्यांचा पोषाख पांढरी पॅन्ट, पांढरा शर्ट, पांढरे बूट व छातीवर रेडक्रॉस चिन्ह असा असतो.

शाळेत त्यांना आवश्यक साहित्य उपलब्ध आहे. ती मुले आपली प्रथमोपचार पेटी जवळ बाळगतात व इतरांना गरजेच्या वेळी मदत करतात.

त्यांच्या अंगी आवश्यक असलेले धैर्य त्यांच्या कामाच्या वेळी दिसून येते. याही मुलांचे एक शिबिर घेण्यात येते. त्यांची कोणालाही मदत करण्याची नेहमी तयारी असते. डॉ. सुभेदार आणि पावडे यांनी मुलांच्या प्रेमाखातर शाळेतील हया संस्थेला काही रामबाण औषधे दिली. त्यांचा उपयोग मुलांना होतो. मुले व शिक्षक हयांना त्या गोळीचा परिचय 'स्काऊटची गोळी' असाच आहे. कोणताही साधा ताप, खोकला, सर्दी हयासारख्या आजारावर तावडतोब गुणकारी असे हे औषध आहे. हया संस्थेत बहुधा डॉक्टरांचीच मुले येतात. त्यांना घरी औषधांचे व प्रथमोपचाराचे आपोआप थोडेसे ज्ञान झालेले असतेच. त्याने त्यांना अधिक गोडी वाटते.

श्री. ह. चं. लाडकर
कार्यकर्ता, रेडक्रॉस सोसायटी युनिट

शाळेचे बुक स्टॉल

एक लहानसे बुकस्टॉल शाळेत चालविले जाते. हे स्टॉल गेल्या काही वर्षांपासून चालविले जाते. मुलांना आवश्यक असलेली पुस्तके हयात ठेवली जातात. याशिवाय इतर शालोपयोगी वस्तू असतात. हे स्टॉल बहुधा मुलेच चालवितात. सर्व मुले प्रामाणिक असल्याने कधीच गोंधळ होत नाही. शाळेच्या इमारतीचा ब्लॉक असलेल्या वह्या मुद्दाम करवून घेतलेल्या आहेत. गरीब मुलांना हयातील नफ्याच्या रकमेतून वह्या पुस्तके दिली जातात. हया स्टॉलचा उपयोग शिक्षक, मुले व चपराशी या सर्वांनाच होतो.

ह. चं. लाडकर

विज्ञान मंडळ

माझा शाळेशी प्रथम संबंध आला तो १९५८ मध्येच. त्यावेळी प्रशिक्षणासाठी हडस हायस्कूल मला देण्यात आले. पुढील वर्षीच शाळेने माझी प्रशिक्षित विज्ञानशिक्षक म्हणून नेमणूक केली. त्या पेशात माझे पहिले पाऊल असल्यामुळे मी मोठ्या उत्साहाने व धडाडीने कामास सुरवात केली. सूक्ष्म निरीक्षणांत मला खालील गोष्टी आढळल्यात. विद्यार्थी कामसू, चुणचुणीत व विषयाची आवड असणारे दिसले. मात्र त्यांचा सर्व भर त्यांच्या पुस्तकातील अभ्यासक्रम पाठ करून त्या विषयात प्रावीण्य संपादणे यावरच दिसला. अर्थात ही गोष्ट व्यवहारास धरून असली तरी शास्त्राचा जो मुख्य हेतू 'नवनिर्मिती' हा त्यात साधण्यासारखा नव्हता. म्हणून मी व माझे सहकारी मिळून एक पंचसूत्री योजना आखली.

विज्ञान प्रदर्शन—१९५९ च्या झालेल्या स्नेह-संमेलनात विज्ञानप्रदर्शन आयोजित केले व त्या-बद्दलची वक्षिसेही जाहीर केलीत. त्यामुळे चुरस उत्पन्न होऊन सुमारे ८–१० मॉडेल्स व तक्ते आलेत. काही वस्तू अगदी प्राथमिक स्वरूपाच्या होत्या पण त्यात विद्यार्थ्यांची कल्पकता दिसून आली. प्रदर्शनात भाग घेतलेल्या विद्यार्थ्यांचे एक **विज्ञान मंडळ** स्थापन केले... नंतर वर्षभर लहान मोठी मॉडेल्स, उपकरणे तयार केलीत. सुरवातीस वक्षिसाचे आमिषासाठी पण नंतर हळूहळू त्यात गोडी उत्पन्न झाल्यामुळे बऱ्याच विद्यार्थ्यांनी प्रदर्शनीय वस्तू तयार केल्यात. मग प्रश्न उभा राहिला तो हा की रोज नवीन वस्तू तयार करण्यास नवीन कल्पना कोठून आणावयाची ? ही समस्या मी मुख्याध्यापकांशी चर्चा करून सोडविली.

वाचनालयाचा विज्ञान विभाग—आम्ही (मी व माझे सहकारी) चौकशी करून, भेट देऊन, पत्रव्यवहार करून प्रथम उपयुक्त पुस्तकांची यादी तयार केली व ती विविध पुस्तके मागविली. त्यामुळे वाचनालयाच्या विज्ञान विभागातील पुस्तकांची संख्या सुमारे ३० वरून ९० वर गेली. अर्थातच मुलांच्या वाचनात भर पडल्यामुळे प्रात्यक्षिके व उपकरणे यांची निर्मिती वाढली. आज विज्ञान विभागात सुमारे २०० च्या वर पुस्तके आहेत.

आमच्या वैज्ञानिक सहली—नित्याच्या शिस्तबद्ध कार्यक्रमामुळे साहजिकच मुलांना कंटाळा येतो. तेव्हा त्यांच्यातील उत्साहाला योग्य वळण देऊन वातावरणाचा बदल, मनोरंजन व ज्ञानार्जन हे तिन्ही हेतू साधण्यास सहलींचा बूट काढला. Outing मुळे शीण नाहीसा होतो व फिरणेही होते. प्रथम आम्ही महानगरपालिकेच्या जलप्रदान व जलशुद्धी-करण केंद्राला (Corporation water works) भेट दिली. वॉटरवर्क्सचे प्रमुख श्री. पुरोहित यांनी आम्हास खूपच सहकार्य दिले. प्रत्येक कामाचे सूक्ष्म निरीक्षण करण्याची संधी दिली. त्याचे टाचण पण विद्यार्थ्यांनी तयार केले. यंदा आम्ही हवामानखात्यास (Meteorological Dept.) भेट दिली. तेथील प्रमुख श्री. बेडेकर यांनी व्यक्तिशः लक्ष पुरवून आम्हास सर्व दाखविले व समजावून सांगितले. आज त्याची पुस्तिका आम्ही तयार केली. याप्रमाणे आम्ही दर वर्षी २–३ सहली काढू लागलो. सहलींमुळे शिक्षक–विद्यार्थी संबंध औपचारिक न राहता जास्त सलोख्याचे झालेत.

